महाराष्ट्र विधानपरिषद

पहिले अधिवेशन, २०२१

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

बुधवार, दिनांक ०३ मार्च, २०२१ / फाल्गुन १२, १९४२ (शके)

(१) मुख्यमंत्री
(२) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री
(३) गृहनिर्माण मंत्री
(४) नगरविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री

} **यांचे प्रभारी विभाग**

प्रश्नांची एकूण संख्या - ६२

नागपूर महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोई सुविधा योजनेंतर्गत निधी अप्राप्त असल्याबाबत

(१) * ७२३१ श्री.प्रवीण दटके : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १३ मधील प्रश्न क्रमांक ६०७३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोई सुविधा विकास योजनेंतर्गत नगरविकास विभाग, शासन निर्णय, मनपा-२०१९/प्र.क्र. ११४, दिनांक ५ ऑगस्ट २०१९ नुसार १५७.५ कोटी अन्य १६९ कोटी असे एकूण ३२६ कोटी अप्राप्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील मूलभूत विकासाची कामे निधीअभावी प्रलंबित असून निधी वितरित होण्याकरीता लोकप्रतिनिधींनी लेखी तक्रार निवेदनाव्दारे पाठपुरावा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने निधी वितरित करण्याकरीता विशेष धोरण आखले आहे काय,

(४) असल्यास, प्रलंबित निधी महापालिकेस वर्ग होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) महानगरपालिका मूलभूत सोई सुविधा योजनेंतर्गत (२२१७ ०९१३) नागपूर महानगरपालिकेसाठी रुपये ३१६.८३ कोटी मंजूर करण्यात आले आहेत.

त्यापैकी रुपये १ कोटी निधी वितरित करण्यात आला असून उर्वरित रुपये ३१५.८३ कोटी निधी प्रत्यक्ष वितरित करण्यात आलेला नाही, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीत निधी, प्रत्यक्ष वितरणासाठी उपलब्ध होणारा निधी व मागण्या यांच्या अधिनतेने निधी वितरणाबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

नगरपंचायत आष्टी, पाटोदा व शिरूर कासार (जि.बीड) या नवीन स्थापित शहरांच्या विकास आराखड्यास मंजुरी मिळण्याबाबत

(२) * ६९६३ श्री.सुरेश धस : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरपंचायत आष्टी, पाटोदा व शिरूर कासार (जि.बीड) या नवीन स्थापित शहरांचा प्रारूप विकास आराखडा अंतिम मंजुरीसाठी शासनाच्या नगर विकास विभागाकडे सादर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रारूप विकास आराखडे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३०(१) मधील तरतुदीनुसार सर्व संविधानिक कार्यवाही पूर्ण करून अंतिम मंजुरीसाठी सादर करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विकास आराखड्यांच्या मंजुरी अभावी अनेक विकास कामे प्रलंबित असल्याने सदर विकास आराखड्यास तात्काळ मंजूरी मिळण्याकरीता शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) होय.

(२) विकास योजना, आष्टी व शिरुर कासार मधील संविधानिक कार्यवाही यथोचित पूर्ण झालेली आहे.

तथापि, विकास योजना, पाटोदा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३० अन्वये विहित मुदत संपल्यानंतर शासनास सादर झालेली असल्याने त्याबाबत संविधानिक कार्यवाही पूर्ण झालेली नाही.

(३) विकास योजना, आष्टी व शिरुर कासार या प्रारुप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१ अन्वये अंतिम निर्णयासाठी शासनाच्या विचाराधीन असून, उक्त अधिनियमामध्ये नमूद विहित कालमर्यादेत त्यावर शासनाकडून निर्णय घेण्यात येणार आहे.

विकास योजना, पाटोदा विहित मुदतीत सादर करण्याबाबत नियोजन प्राधिकरणाने कसूर केली असल्याने उक्त अधिनियमाच्या कलम २१(४)(क) अन्वये नियोजन प्राधिकरणाची कर्तव्ये पार पाडणेसाठी सहसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी दिनांक ०५/०२/२०२१ रोजीच्या आदेशान्वये सहायक संचालक, नगर रचना, बीड शाखा, बीड यांची नियुक्ती केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात मराठा आरक्षण लागू करुन उमेदवारांना नियुक्त्या देण्याबाबत

(३) * ६५३७ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर, श्री.कपिल पाटील, श्री.अरुण लाड : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठा समाजाला आरक्षण लागू करण्याबाबत महाराष्ट्र विधीमंडळात कायदा मंजूर केल्यानंतर दिनांक १ डिसेंबर, २०१८ रोजीपासून त्याची अंमलबजावणी सुरु झाल्यानंतर सदर कायद्यास मा.सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिल्यामुळे उक्त कायद्याची अंमलबजावणी अद्यापही होऊ न शकल्यामुळे मराठा समाजास आरक्षण त्वरीत लागू व्हावे याकरीता राज्यात विविध भागात तीव्र स्वरुपाच्या आंदोलनास सुरुवात झाली असून काही ठिकाणी हिंसक घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठा आरक्षणाबाबत मा.सर्वोच्च न्यायालयात अंतिम निर्णय देईपर्यंत मराठा समाजाच्या इच्छुक विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्टया दुर्बल प्रवर्गासाठीच्या कोटयातून (ईएसडब्ल्यू) शैक्षणिक लाभ घेण्यास परवानगी देण्याबाबत जनहित याचिका करण्यात आलेली असून मा.उच्च न्यायालयाने त्यावर तातडीने सुनावणी घेण्यास दिनांक १४ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास नकार दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठा उमेदवार सन २०१८ पासून नियुक्तीच्या प्रतिक्षेत असताना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शासनास पूर्वसूचना न देता मा.सर्वोच्च न्यायालयात एसईबीसी आरक्षणांतर्गत निवड झालेल्या मराठा तरुणांच्या नियुक्त्या रद्द करणारी याचिका मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केल्यामुळे मराठा उमेदवारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यात मराठा आरक्षण लागू करुन उमेदवारांच्या नियुक्त्या करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उध्दव ठाकरे : (१) होय.

मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्रमांक १५७३७/२०१९ व इतर याचिकांमध्ये दिनांक ९/०९/२०२० रोजी आरक्षण अधिनियम, २०१८ च्या अंमलबजावणीस अंतरिम स्थगिती दिलेली असल्याने दिनांक ९/०९/२०२० नंतर या कायदयाची अंमलबजावणी तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे.

(२) विभागाच्या दिनांक २३/१२/२०२० च्या शासन निर्णयानुसार सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गातील (एसईबीसी) उमेदवारांना आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाचा (ईडब्ल्यूएस) लाभ घेण्याची परवानगी देण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ९/०९/२०२० च्या अंतरिम आदेशामुळे आयोगास त्यांची घटनात्मक कर्तव्ये पूर्ण करण्यासाठी येत असलेल्या अडचणी लक्षात घेऊन भरती प्रक्रिया कोणत्याही विलंबविना व कालबध्द वेळापत्रक पूर्ण करण्याच्या उद्देशाने मा.सर्वोच्च न्यायालयाकडून स्वयंस्पष्ट आदेश प्राप्त होण्याच्या दृष्टीने आयोगाने सिव्हिल अपील क्र.३१२३/२०२० व ३१२६/२०२० दाखल केले होते. दरम्यानच्या कालावधीत सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गातील उमेदवारांना आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाचे लाभ अनुज्ञेय ठरविण्याबाबत दिनांक २३/१२/२०२० च्या शासन निर्णयाच्या पार्श्वभूमीवर आयोगाकडून मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आलेले Interlocutory Application मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

(४) मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०९/०९/२०२० रोजी मराठा आरक्षणास अंतरिम स्थगिती दिलेली असल्यामुळे व सदर अंतरिम स्थगिती अद्याप कायम असल्याने तूर्तास राज्यात मराठा आरक्षण लागू करता येत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामधील रिक्त पदे भरुन इतर सुधारणा करण्याबाबत

(४) * ६८२५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामधील रिक्त पदे भरुन इतर सुधारणा करण्याबाबत पत्र क्र.४६१५/सीआर-१०/२०२०/तीन, दिनांक १४ जुलै, २०२० अन्वये सदर आयोगाने मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनातील सर्वात महत्त्वाचा विभाग समजला जाणाऱ्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगामधील कर्मचारी पद भरती व इतर सुधारणा करण्याबाबत शासनाची भूमिका काय असून शासनातील गट क व ड ची पदे खाजगी यंत्रणेमार्फत राबविल्यामुळे अनेक प्रकारचे गैरव्यवहार मध्यंतरी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोग ही कार्यक्षम संस्था असल्याने तिला बळकटीकरण करण्याच्या दृष्टीकोनातून सदर आयोगाने मागणी केलेल्या सुधारणेबाबत शासनाने चौकशी करुन तात्काळ निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उध्दव ठाकरे : (१) होय, हे खरे आहे.
(२) शासनाची गट-ब (अराजपत्रित), गट-क ची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याचा निर्णय झाल्यास, त्यानुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मागणीनुसार आवश्यक पदे देण्याचा प्रस्ताव वित्त विभागास मान्यतेस्तव सादर करण्यात येईल.

भूतपूर्व निवड मंडळाच्या कार्यकक्षेतील गट-क आणि गट-ड संवर्गातील पदांची खाजगी यंत्रणेमार्फत अद्यापपर्यंत परीक्षा प्रक्रिया राबविण्यात आली नसल्याने गैरव्यवहाराचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) आयोगाच्या बळकटीकरणासाठी संगणक खरेदी व इतर आवश्यक बाबींच्या खरेदीस शासनाने मान्यता दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

म्हाडाकडील संक्रमण सदनिकांच्या भाड्यापोटी विकासकाने कोटयवधी रुपये थकविल्याबाबत

(५) * ६३५८ श्री.प्रसाद लाड, श्री.महादेव जानकर, डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारती रिकाम्या करावयाचे ठरविले तर म्हाडाच्या इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाकडे सध्या केवळ २५ सदनिका उपलब्ध आहेत इतकेच नव्हेतर सुमारे सात हजार संक्रमण सदनिकांपैकी सध्या साडेतीन हजार सदनिका विकासकांच्या ताब्यात असून सदर विकासकांनी संक्रमण सदनिकांच्या भाड्यापोटी म्हाडाचे रूपये १०० कोटी थकविले असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सक्रमण शिबिरातील म्हाडाच्या विविध विकासकाकडे असलेल्या साडेतीन हजार सदनिका तसेच सदनिकांच्या भाड्यापोटी विकासकांनी थकविलेले रुपये १०० कोटी विनाविलंब वसूल करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) म्हाडाने सुरू केलेल्या प्रक्रियेनंतर प्रत्यक्षात किती सदनिका ताब्यात मिळाल्या असून किती थकबाकीची रक्कम वसूल करण्यात आली आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड : (१) होय, हे खरे आहे.

(२) १. विकासकांकडील संक्रमण गाळ्यापोटी थकीत भाड्याच्या वसूलीकरीता मा.न्यायालयामध्ये Recovery Civil Suit दाखल करण्याबाबत संबंधित पॅनल वकील यांना मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी कळविले आहे.

२. यापैकी विकासक मे.एस.डी.कॉर्पोरेशन यांचेविरुध्द मा.उच्च न्यायालयामध्ये मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांच्याव्दारे शपथपत्र दाखल करण्यात आले आहे.

३. तसेच विकासक मे.वर्धमान डेव्हलपर्स यांचेविरुध्द मा.उच्च न्यायालयाकडे दाखल करावयाच्या Recovery Civil Suit चा मसूदा (Draft) म्हाडाच्या विधी विभाग यांचेकडे अभिप्राय/तपासणी करुन मा.उच्च न्यायालयामध्ये Recovery Civil Suit दाखल करण्याबाबत संबंधित पॅनल वकील यांचेकडे मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी दिला आहे.

४. संक्रमण गाळयांच्या भाड्याची थकबाकी असणाऱ्या विकासकांविरुध्द म्हाड अधिनियम १९७६ चे कलम १८० अंतर्गत कार्यवाही करण्याकरीता विकासक यांची जंगम व स्थावर मालमत्ताबाबतचा तपशिल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड व पालघर यांना दिनांक २९/०९/२०१७ अन्वये व तसेच स्मरणपत्र दिनांक १९/०७/२०१८ तसेच स्मरणपत्र क्र. २, दिनांक २३/१०/२०२० अन्वये मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांच्याव्दारे कळविण्यात आले असून त्याबाबतची माहिती अद्याप पर्यंत अप्राप्त आहे.

५. वि.नि.नि. ३३(१०) अंतर्गत १२ विकासक यांना संक्रमण गाळयापोटी थकीत भाडे भरणा करीत नाहीत तोपर्यंत सदर विकासक यांना इतर परवानग्या देण्यात येऊ नये याबाबत दिनांक २३/१०/२०२० अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना मंडळाकडून कळविण्यात आले आहे.

६. सर्व विकासकांना मंडळामार्फत थकीत रकमेचा भरणा त्वरीत करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

७. विकासकांना वितरित करण्यात आलेल्या संक्रमण गाळ्याच्या भाड्यापोटी थकीत रकमेचा भरणा न करुन शासनाचे आर्थिक नुकसान केल्यामुळे थकबाकीदार विकासक यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत दिनांक १८/०३/२०१८ अन्वये एकूण १२ विकासक व दिनांक ०९/०२/२०२१ अन्वये नव्याने १० विकासक असे एकूण २२ विकासकाविरुध्द खेरवाडी पोलीस स्टेशन येथे मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने तक्रार दाखल केली आहे. उर्वरीत विकासक यांचेविरुध्द मा.न्यायालयामध्ये Recovery Civil Suit दाखल करण्याबाबत पॅनल वकील यांच्याकडे मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने आवश्यक ते दस्तऐवज पुरविले आहेत.

(३) १. मे.सराह डेव्हलपर्स यांनी २ गाळे मंडळाच्या ताब्यात दिले आहेत. तसेच विकासक मे.युनिवर्सल कंस्ट्रक्शन कंपनी यांचे ताब्यातील २१ संक्रमण गाळे दिनांक २०/०१/२०२१ च्या पत्रान्वये मंडळाच्या ताब्यात घेण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

२. विकासक यांना काम थांबवा नोटीस (Stop Work Notice) दिल्यानंतर दिनांक ०१ एप्रिल, २०१६ ते दिनांक ३१ मार्च, २०१९ या कालावधीमध्ये रक्कम रुपये ८५.११ कोटी, दिनांक ०१ एप्रिल, २०१९ ते ३१ मार्च, २०२० दरम्यान रुपये १८.०३ कोटी व चालू वर्षामध्ये दिनांक ०१ एप्रिल, २०२० ते दिनांक ३१ जानेवारी, २०२१ दरम्यान रुपये १९.४५ लक्ष अशी एकूण रुपये १२२.५९ कोटी थकीत भाड्याची वसूली २९ विकासक यांचेकडून करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत माहे जानेवारी, २०२१ अखेर मुद्दल रक्कम रुपये ११३.८० कोटी थकीत आहे.

३. तसेच थकबाकीदार विकासक यांचे ताब्यातील संक्रमण गाळे मंडळाचे ताब्यात घेण्याकरीता विशेष मोहिमेंतर्गत मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाव्दारे पथक स्थापना करण्यात आले आहे. परंतु कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे सदरची मोहिम राबविणे शक्य झाले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद महानगरपालिका आरोग्य विभागातील विविध संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत

(६) * ६४२१ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिका आरोग्य विभागातील विविध संवर्गातील ३४९ मंजूर पदापैकी १२१ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्यासंदर्भात तत्कालीन नगर विकास राज्यमंत्री यांच्याकडे दिनांक ६ ऑगस्ट, २०१९ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार महानगरपालिकेने दिनांक २३ सप्टेंबर, २०१९ रोजी आरोग्य विभागातील विविध संवर्गातील एकूण ९५९ पदांचा शासनास सादर केलेल्या आकृतिबंधास महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात आलेली नसल्यामुळे सदर प्रस्ताव महानगरपालिकेकडे परत पाठविण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त आकृतिबंधामध्ये आरोग्य विभागातील उक्त नमूद पदांचा समावेश करण्यात आला असून सदर प्रस्तावाबाबत शासनाने महानगरपालिकेस केलेल्या सूचनेनुसार आकृतिबंधाचा सुधारीत प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने औरंगाबाद महानगरपालिका आरोग्य विभागातील विविध संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्व विभागांच्या पदांचा एकत्रित आकृतिबंध सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी शासनाच्या मान्यतेसाठी सादर केला होता. सदर आकृतिबंधामध्ये आरोग्य विभागातील पदांचा समावेश करण्यात आला आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेच्या आरोग्य विभागासह अन्य विभागांच्या एकूण ५७१६ पदांच्या आकृतिबंधास शासन निर्णय, दिनांक १५/०२/२०२१ अन्वये शासनाची मान्यता देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

गुहागर-विजापूर राष्ट्रीय महामार्गाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(७) * ७२२२ श्री.अरुण लाड : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर-विजापूर १६६-ई या राष्ट्रीय महामार्ग बांधणीचे काम पूर्ण होण्याचा अंतिम कालावधी माहे डिसेंबर, २०१९ मध्ये पूर्ण झाला असूनही सदरहू महामार्गाचे काम अपूर्णावस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पलूस (ता.पलूस, जि.सांगली) येथील मार्गावरील ताकारीपासून ते तासगावपर्यंत रस्त्याच्या प्रलंबित कामामुळे महामार्गाकरीता भूसंपादित करण्यात आलेल्या ताकारी, घोगाव, कुंडल, पलूस, सांडगेवाडी, बांबवडे, येळावी येथील बाधित शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला मिळाला नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याच्या अपूर्ण कामामुळे उक्त ठिकाणी अतिक्रमण व अवैध वाहन पार्किंग होत असून वाहन अपघाताच्या प्रमाणात दररोज वाढ होत असल्यामुळे उक्त रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी केली असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१) हे अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत सदर काम प्रगतीत असून दिनांक २६/१२/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

प्रश्नामधील नमूद गावे ही राष्ट्रीय महामार्ग क्र.२६६ मध्ये येत असून त्यापैकी १) ताकारी हे गाव वाळवा तालुक्यातील २) घोगाव, कुंडल, पलूस, सांडगेवाडी व बांबवडे ही गावे पलूस तालुक्यातील आणि ३) येळावी हे गांव तासगांव तालुक्यातील आहे. या गावांपैकी मौजे ताकारी (ता.वाळवा) व मौजे पलूस (ता.पलूस) या गावामध्ये भूसंपादनाची आवश्यकता नसल्याने ही गावे संपादन प्रक्रियेतून वगळण्यात आली आहेत.

प्रश्नामधील नमूद उर्वरीत गावांमधील आवश्यक जमिनीचे भूसंपादन हे राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ मधील तरतुदींनुसार करण्यात येत आहे. सद्य:स्थितीत भूसंपादन प्रक्रिया प्रगतीपथावर असून भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण होताच निवाड्यांतर्गत बाधित शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला वाटप करण्यात येईल.

(३) हे खरे नाही.

सदरचे निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) स्थानिक लोकांचा महामार्गाच्या अस्तित्वातील हद्दीमध्ये काम करणेस विरोध असल्यामुळे विलंब झाला आहे.

घणसोली (नवी मुंबई) परिसरातील खारफुटीवर डेब्रिज टाकण्यात येत असल्याबाबत

(८) * ६५२५ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घणसोली (नवी मुंबई) परिसरातील खाडी किनारी मोठ्या प्रमाणात खारफुटीवर डेब्रिज टाकून भराव टाकण्याचे काम माफियाकडून सुरू असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरात डेब्रिज आणि माती भरावामुळे स्वच्छता अभियानाचा अभाव दिसून येत असून डेब्रिजला डोंगराचे स्वरूप प्राप्त झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार दोषी विरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) हे खरे नाही.

घणसोली खाडी किनाऱ्यालगतची जमीन सिडको व वन विभागाच्या मालकीची आहे. घणसोली, सेक्टर १३ येथील सुमारे १,४५,४५२.९६ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड क्र. १ सिडकोने नवी मुंबई महानगरपालिकेला क्रीडा संकुलासाठी दिलेला आहे.

सदर भूखंड हा सखल व खोलगट असल्याने नवी मुंबई महानगरपालिकेच्या विकास कामातून निघालेली घनमाती सदर भूखंडावर टाकण्यात येते तथापि, खारफुटीवर डेब्रिज टाकण्यात येत नाही.

(२) नवी मुंबई महानगरपालिकेच्या विकास कामातून निघालेली घनमाती भूखंड क्र. १ येथे टाकण्यात येत असून त्याचे वेळोवेळी सपाटीकरण करण्यात येते.

(३) खारफुटीवर डेब्रिज टाकण्यात येऊ नये यासाठी डेब्रिज भरारी पथकामार्फत नियमित गस्त घालत असल्याचे, नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वसई-विरार महानगरपालिका (जि.पालघर) येथे महिलांच्या वैद्यकीय तपासणीसाठी वैद्यकीय कक्ष नसल्याबाबत

(९) * ६८७७ श्री.रविंद्र फाटक, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अमोल मिटकरी, श्री.संजय दौंड : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिका (जि.पालघर) येथे अतिप्रसंग वा बलात्कार झालेल्या महिलांच्या वैद्यकीय तपासणीसाठी कोणतेही वैद्यकीय कक्ष नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई-विरार महानगरपालिकेच्या डी.एम.पेटीट व तुळींज रुग्णालय येथे वैद्यकीय कक्ष सुरु करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका यांना माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने वैद्यकीय कक्ष सुरु करण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) व (२) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात महिलांवरील अत्याचार (बलात्कार) पिडीत महिलेची पुढील वैद्यकीय तपासणीची सुविधा उपलब्ध नसून पिडीतेची वैद्यकीय तपासणीकरीता विलंब होत असल्याचे निवेदन माहे जानेवारी, २०२१ मध्ये वसई-विरार शहर महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे.

सदर निवेदनात वसई-विरार महानगरपालिकेच्या सर डी.एम.पेटीट व तुळींज रुग्णालयामध्ये अतिप्रसंग वा बलात्कार झालेल्या महिलांच्या वैद्यकीय तपासणीसाठी वैद्यकीय कक्ष सुरु करणेबाबतची बाब नमुद केली आहे.

(३) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात अतिप्रसंग व बलात्कार झालेल्या पिडीत महिलेची पुढील तपास प्रक्रिया व वैद्यकिय तपासणी विनाविलंब तातडीने होण्याची आवश्यकता विचारात घेता, वसई-विरार शहर महानगरपालिकेने खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे :-

- वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत सर डी.एम.पेटीट व तुळींज रुग्णालयामध्ये दिनांक १०/०२/२०२१ रोजी स्वतंत्र कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे.
- सदर कक्षामध्ये सहा स्त्रीरोग तज्ञांची (MBBS/MS/DNB/Obst. & Gynaec) नेमणूक करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील वरळी, नायगाव, ना.म. जोशी मार्ग येथील बीडीडी चाळींचा पुनर्विकास अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(१०) * ७०३५ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रशांत परिचारक, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अभिजित वंजारी : तारांकित प्रश्न क्रमांक १९३८ ला दिनांक ४ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वरळी, नायगाव, ना.म.जोशी मार्गावरील बीडीडी चाळींचा भूमिपूजन सोहळा दिनांक २२ एप्रिल, २०१७ रोजी तत्कालीन माजी मुख्यमंत्री यांच्या हस्ते वरळी येथील जांबोरी मैदानात पार पडला असूनही गत तीन वर्षापासून पुनर्विकासाची प्रक्रिया संथगतीने सुरु असल्याने निवड झालेल्या कंपन्यांनी सदर प्रकल्पातून माघार घेण्याचे पत्र म्हाडाला दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ना.म.जोशी मार्ग येथील पुनर्वसन इमारतींमध्ये स्थलांतरीत झालेल्या पात्र भाडेकरुंना घरे वितरित करण्याकरीता आयोजित केलेली सोडत तीन वेळा रद्द करण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरळी, नायगाव, ना.म.जोशी मार्ग येथील बीडीडी चाळीच्या अधिकृत वास्तुविशारदांची सह्याद्री अतिथीगृहावर पार पडलेल्या बैठकीत म्हाडामार्फत घेण्यात आलेल्या सादरीकरणात "वास्तु विशारद" स्पर्धेत बाद झालेल्या कंत्राटदारामार्फत सादरीकरण करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मुंबईतील बीडीडी चाळींचा पुनर्विकास जलदगतीने करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड : (१) दिनांक २२/०४/२०१७ रोजी तत्कालीन माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांच्या शुभहस्ते जांबोरी मैदान वरळी येथे नायगांव व ना.म. जोशी मार्ग, लोअर परेल येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाच्या योजनेचा भूमीपूजन समारंभ करण्यात आला.

ना.म.जोशी मार्ग व नायगांव प्रकल्पांच्या कंत्राटदारास दिनांक २१/०४/२०१७ रोजी कार्यादेश जारी केले व वरळी प्रकल्पासाठी कार्यादेश दिनांक ०४/०१/२०१९ रोजी जारी केले. वरळी प्रकल्पांतर्गत संक्रमण शिबिराचे काम सुरू करण्यात आले होते.

ना.म.जोशी मार्ग व नायगांव प्रकल्पात प्रत्यक्ष पुनर्वसन कामास सुरूवात झालेली नाही, ही वस्तुस्थिती आहे.

नायगांव येथील प्रकल्पाचे काम सुरु होऊ न शकल्यामुळे प्रकल्पाचे कंत्राटदार मे.लार्सन ॲण्ड टुब्रो लिमिटेड यांनी दिनांक ०३/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये कंत्राट संपुष्टात आणण्याबाबत नोटीस जारी केली होती. तथापि, कंत्राटदाराने दिनांक ०४/१२/२०२० रोजीच्या पत्रान्वये प्रकल्पाचे काम सुरु ठेवण्याबाबत संमती दर्शविली आहे.

वरळी व ना.म.जोशी मार्ग येथील प्रकल्पाच्या कंत्राटदाराने प्रकल्पातून माघार घेण्याबाबतची अशी कोणतीही नोटीस दिलेली नाही.

(२) ना.म.जोशी मार्ग येथील स्थलांतरित झालेल्या भाडेकरुंच्या प्रस्तावित पुनर्वसन सदनिका निश्चित करण्यासाठी आयोजित केलेली सोडत कोविड-१९ चा प्रादुर्भाव व काही तांत्रिक कारणामुळे तीनवेळा रद्द करण्यात आली आहे. तथापि, या संगणकीय सोडतीचा कार्यक्रम दिनांक ११/०२/२०२१ रोजी मा.मंत्री (गृहनिर्माण) व मा.मंत्री (पर्यावरण) यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

(३), (४) व (५) बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पासाठी तातडीने करावयाच्या उपाययोजना सूचविण्यासाठी दिनांक २९/१२/२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये उपाध्यक्ष, म्हाडा यांचे अध्यक्षतेखाली समिती गठित केलेली आहे. सदरहू समितीने दिनांक १५/०२/२०२१ रोजी अहवाल शासनास सादर केलेला आहे.

सदरहू समितीचा अहवाल मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील शक्ती प्रदत्त समितीच्या विचारार्थ सादर केला आहे. सदरहू समितीच्या शिफारशीनंतर उचित निर्णय शासनस्तरावर घेण्यात येणार आहे.

नागपूर येथील शासकीय दंत महाविद्यालय व रूग्णालयाचे बांधकाम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(११) * ६४६० श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय दंत महाविद्यालय व रूग्णालयाचे बांधकाम अपूर्णावस्थेत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी कंत्राटदाराने वेळेत काम न केल्याप्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१) होय, हे खरे आहे.

सदरचे काम मार्च, २०२० पर्यंत सुरळीत सुरु होते. परंतु, कोविड-२०१९ च्या प्रादुर्भावामुळे सदरचे काम पूर्णत: बंद होते. सद्य:स्थितीत सदरचे काम सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर-अक्कलकोट मार्गावरून सहा गावांना जोडणाऱ्या कर्देहळ्ळी मार्गावर उड्डाणपूल वा भूयारी मार्ग उभारण्याबाबत

(१२) * ७४९७ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर-अक्कलकोट महामार्गाचे काम अंतिम टप्प्यात असून अनेक ठिकाणी उड्डाणपूल व भूयारी मार्ग उभारण्याचे काम सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर-अक्कलकोट मार्गावरून कर्देहळ्ळी, शिर्पनहरळी, धोत्री, वडगाव, रामपूर, दिंडूर या सहा गावांना जोडणाऱ्या तसेच दळणवळनासाठी गरजेच्या असलेल्या कर्देहळ्ळी मार्गावर उड्डाणपूल वा भूयारी मार्ग उभारण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्देहळ्ळी फाट्यावर उड्डाणपूल वा भूयारी मार्ग न उभारण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त ठिकाणी उड्डाणपूल वा भूयारी मार्ग उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१) हे खरे आहे.

सदर काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत येते.

(२) हे खरे आहे.

(३) अक्कलकोट-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्र.१५० ई येथून मार्गावरून कर्देहळ्ळी, शिर्पनहरळी, धोत्री, वडगाव, रामपूर, दिंडूर या सहा गावांना जोडणारे 'कर्देहळ्ळी' गाव हे अक्कलकोट-सोलापूर कर्देहळ्ळी फाटा कि.मी.१२९/४५० या ठिकाणापासून चार कि.मी. अंतरावर आहे.

विषयांकित प्रकल्पाबाबतच्या सवलतीच्या करारनाम्यानुसार कि.मी. १३०/४२० मौजे 'कुंभारी' येथे उड्डाणपूल/भूयारी मार्ग बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे. यास्तव आय.आर.सी.-एस.पी. ८४/२०१४ च्या मानकानुसार प्रकल्पांतर्गत बांधण्यात येत असलेल्या उड्डाणपूलापासून दोन कि.मी. अंतरामध्ये पादचारी भूयारी मार्ग/पादचारी पूल देण्याची तरतूद नाही, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सोलापूर यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

गोठणगांव फाटा ते वैरागड मार्ग (ता.आरमोरी, जि.गडचिरोली) येथील सिमेंट काँक्रीट रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

(१३) * ६९०४ श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोठणगांव फाटा ते वैरागड मार्ग (ता.आरमोरी, जि.गडचिरोली) येथे सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत सिमेंट काँक्रीट रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने दोन महिन्यात वळण रस्त्याची दुरवस्था झाल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१) व (२) कुराखेड वैरागड रस्ता रा.मा.क्र.३७७ कि.मी.२६/१०० येथे वैरागड गावाचे प्रवेशव्दाराजवळील वळणावर ३९.८०० मी. चा भाग खोलगट असल्यामुळे तसेच जड वाहनांची वाहतूक वर्दळ जास्त असल्याने या वर्षीच्या प्रदीर्घ पावसामुळे व अतिवृष्टीमुळे सदर लांबी खराब झाली होती. सदर ३९.८०० मी. लांबी डांबरी खोलगट असल्याने डांबरी पृष्ठभाग नेहमी खराब होत असे. त्यामुळे सदर रस्त्यावर कायमस्वरुपी दुरुस्ती करण्याच्या दृष्टीने व्दिवार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत Base course M-२५ Grade Cement concrete चे काम करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत रस्ता सुस्थितीत असून वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला शहर (जि.अकोला) येथील स्थानिक विमानतळाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(१४) * ७२१३ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.गोपिकिशन बाजोरीया : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातील सन १९४३ ब्रिटिश शासनाच्या काळात सार्वजनिक बांधकाम विभागाने शिवनीत विमानतळाची उभारणी केली असून सदर स्थानिक विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी भूसंपादन करण्याबाबत जिल्हाधिकारी, अकोला यांनी माहे डिसेंबर, २०१९ मध्ये शासनास प्रस्ताव सादर केल्यानंतर संयुक्त मोजणी अंती २२.२४ हेक्टर आर जमिनीची आवश्यकता असल्याचे निष्पन्न झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विमानतळाचे धावपट्टीचे विस्तारीकरण करण्याकरीता डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या मालकीची एकूण ६०.६८ हेक्टर जमीन हस्तांतरित करुनही सदर प्रकरण प्रलंबित असून भूसंपादनाबाबतचा व्यवहार्यता अहवाल तयार करून शासनास सादर करण्याच्या सूचना महाराष्ट्र विमान विकास कंपनीस देण्यात आल्याचे व त्यानुसार महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांना कळविले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भूसंपादनाकरीता निधीची पूर्तता करण्यासंदर्भात नियोजन करण्यात आले आहे काय, तसेच विमानतळाचे काम तातडीने पूर्ण करुन जिल्ह्यात औद्योगीकरण व रोजगारास चालना मिळण्याच्या दृष्टीने काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच शिवनी विमानतळाच्या धावपट्टीचे विस्तारीकरण करण्याऐवजी अकोला ते शेगांव यामध्ये नविन विमानतळ उभारण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उध्दव ठाकरे : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) संयुक्त मोजणीअंती सदर विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी सुमारे २२.२४ हे. आर जमिनीची आवश्यकता असल्याचे निष्पन्न झाले आहे. मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली अकोला विमानतळाच्या विकासाकरीता आढावा बैठक दिनांक ७ फेब्रुवारी, २०२० रोजी घेण्यात आली होती. सदर बैठकीत मा.मुख्यमंत्र्यांनी अकोला विमानतळाच्या विकासाबाबत व विस्तारीकरणाबाबत व्यवहार्यता अभ्यास अहवाल करण्यास सुचविले. अकोला विमानतळ हे भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांच्या मालकीचे असल्याने सदर विमानतळाच्या व्यवहार्यता अभ्यास अहवाल भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांनी करावे असे महारष्ट्र विमानतळ विकास कंपनीने त्यास कळविले आहे. यासंदर्भात भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाकडून उत्तर अद्याप आलेले नाही.

(४) शिवनी विमानतळाच्या धावपट्टीचे विस्तारीकरण करण्याऐवजी अकोला ते शेगांव यामध्ये नवीन विमानतळ उभारण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर महापालिकेच्या विविध विभागात कार्यरत कंत्राटी व अस्थायी कर्मचाऱ्यांच्या मागण्याबाबत

(१५) * ६७९८ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, श्री.निलय नाईक : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महापालिकेच्या विविध विभागात कार्यरत कंत्राटी व अस्थायी कर्मचाऱ्यांनी दिनांक १२ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास त्यांच्या विविध मागण्यांसाठी संविधान चौकात धरणे आंदोलन केल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर महानगरपालिकेमध्ये सफाई कामगारांना स्थायी करण्याकरीता अधिसंख्य पदे निर्माण करणे, लाड-पागे समितीच्या शिफारशी लागू करणे, कर्मचाऱ्यांच्या कामाच्या वेळा निश्चित करणे तसेच घनकचरा व्यवस्थापनातील कामगारांना किमान वेतन लागू करणे व इतर मागण्यांसाठी सदर धरणे आंदोलन करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर कामगारांच्या मागण्यासंदर्भात त्वरित कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) नागपूर जिल्हा मनपा/नपा/न.प. कंत्राटी कामगार संघटनेच्या दिनांक ११/०१/२०२१ रोजीच्या पत्रानुसार, ए.जी. एन्वायरो इन्फ्रा प्रोजेक्टस प्रा.लि. या कचरा वाहून नेणाऱ्या कंपनीतील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्याकरीता संविधान चौकात दिनांक १२/०१/२०२१ रोजी आंदोलन करण्यात येणार असल्याचे नागपूर महानगरपालिकेस कळविले होते.

तथापि, प्राप्त माहितीनुसार सदरहू स्थळावर आंदोलन झाल्याचे दिसून आलेले नाही.

(२) नागपूर जिल्हा मनपा/नपा/न.प. कंत्राटी कामगार संघटनेच्या दिनांक ११/०१/२०२१ च्या निवेदनात मुख्यत्वे खालीलप्रमाणे मागण्या दिसून येतात. :-

१) शासनाकडून निश्चित केलेल्या दराने, कंपनी कामगारांना पगार देत नाही.

२) कंपनी ई.एस.आय.चे पैसे भरत नाही त्यामुळे कामगार ई.एस.आय.चे दवाखान्यात गेले असता, त्यांना त्याचा लाभ भेटत नाही.

३) कर्मचाऱ्यांना कंपनीकडून “नैमित्तिक रजा” दिली जात नाही.

४) कंपनीकडून कामगारांना, गणवेश, खाकी वर्दी, निळी वर्दी, मास्क, गमबूट इ. गरजेच्या वस्तू दिल्या जात नाहीत.

५) कामगाराकडून वाहन चालविताना अपघात झाल्यास, कंपनी त्याची जबाबदारी घेत नाही व जर काही नुकसान भरपाईची वेळ आली असता, इन्शुरन्सची रकम उचल न करता संबंधित वाहनचालकाकडून त्याची बेकायदेशीरपणे वसुली केली जाते.

(३) व (४) नागपूर जिल्हा मनपा/नपा/न.प. कंत्राटी कामगार संघटनेच्या दिनांक ११/०१/२०२१ च्या निवेदनातील मागण्यासंदर्भात, आवश्यक उपाययोजना करण्याबाबत दिनांक ११/०१/२०२१ च्या पत्रान्वये नागपूर महापालिकेने, ए.जी. एन्वायरो इन्फ्रा प्रोजेक्टस प्रा.लि. या कंपनीस कळविले होते.

याबाबत कंपनीकडून दिनांक ०१/०२/२०२१ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार, या संघटनेच्या सदरहू मागणीच्या अनुषंगाने, कंपनीकडून या संघटनेविरुध्द मा.कामगार न्यायालयामध्ये याचिका दाखल करण्यात आलेली असून, या प्रकरणी मा.कामगार न्यायालयाने, "स्थगिती आदेश" पारित केले आहेत व सदरचे प्रकरण मा.कामगार न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

पालम (जि.परभणी) नगरपंचायतमध्ये गैरकारभार झाल्याबाबत

(१६) * ६८६० श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक ३००१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालम (जि.परभणी) नगरपंचायती मधील विविध गैरव्यवहाराप्रकरणी मुख्याधिकारी यांची विभागीय चौकशी करणे, ठेकेदाराकडून रुपये १ कोटी १० लक्ष इतक्या रक्कमेची वसूली करणे, कन्सल्टंन्ट अभियंताविरूध्द कारवाई तसेच नगराला इंडिया प्रा.लि. कंपनीस काळया यादीत टाकणे, पोलीस ठाण्यात गुन्हे नोंदविणे, थर्ड पार्टी ऑडीटरची चौकशी करणे व इतर प्रकरणी अद्याप कोणतीही सक्षम कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने उच्चस्तरीय कार्यवाही करावी अशी परभणी येथील सामाजिक कार्यकर्ते यांनी प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांच्याकडे सन २०२१ मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रार नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची थोडक्यात व सविस्तर माहिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) हे खरे नाही.
(२) अशा आशयाची तक्रार नगर विकास विभागास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(३) जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, जिल्हाधिकारी, परभणी यांनी उपविभागीय अधिकारी, गंगाखेड यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत केली होती. सदर समितीमार्फत प्रशासकीय बाबी तपासल्यानंतर तांत्रिक बाबी तपासण्यासाठी जिल्हाधिकारी, परभणी यांनी उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, पूर्णा व इतर नगरपरिषदेतील अभियंता यांच्यामार्फत पथक गठीत करुन रितसर तांत्रिक तपासणी करण्यात आली.

उक्त चौकशी समितीच्या अभिप्रायानुसार कामात दोषी आढळलेल्यांवर खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली असल्याबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांनी अहवाल सादर केला आहे :-

(अ) संबंधित ठेकेदाराने रुपये ४८,१८,४९२/- इतक्या मूल्याचे कमी प्रमाणात केलेले काम, त्याच्या स्वखर्चाने पूर्ण केले आहे.
(ब) ज्यात सुधारणा करणे अवघड असल्याने रुपये ११,०१,७८५/- इतकी ठोक रक्कम ठेकेदाराकडून वसूल करण्यात आली आहे.
(क) सदर ठेकेदाराचे नाव नगरपंचायत पालम यांनी काळ्या यादीत टाकले आहे.
(ड) सदर कामाशी संबंधित सल्लागार अभियंता यांच्याविरुध्द पालम येथील पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांचे नाव नगरपंचायत पालम यांनी काळ्या यादीत टाकले आहे.

(इ) सदर कामामध्ये Third Party Audit ची तपासणी बरोबर झाली नसल्यामुळे जिल्हाधिकारी, परभणी यांच्या कार्यालयाकडून प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

(ई) तत्कालीन मुख्याधिकारी, नगरपंचायत पालम यांच्याविरुध्द कर्तव्यात कसूर केल्याबाबत, तसेच ठेकेदारास काम न करता रक्कम अतिप्रदान केल्याबाबत विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

तत्कालीन मुख्याधिकारी, नगरपंचायत पालम यांच्याविरुध्द प्रस्तावित करण्यात आलेल्या विभागीय चौकशीच्या अनुषंगाने, अधिकची कागदपत्रे उपलब्ध करण्याबाबत जिल्हाधिकारी, नांदेड यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्ह्यातील भिडेवाडा राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्याबाबत

(१७) * ६८९६ श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर : तारांकित प्रश्न क्रमांक ७३८ ला दिनांक ४ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील भिडेवाडा बुधवारपेठ या दुमजली वाड्यात दिनांक १ जानेवारी, १८४८ रोजी भारतातील पहिली स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ऐतिहासिक भग्न अवस्थेतील वास्तू शासनाने ताब्यात घेवून राष्ट्रीय स्मारक करण्याबाबत पुणे महानगरपालिकेच्या दिनांक २१ फेब्रुवारी, २००६ रोजीच्या ठरावानुसार भिडेवाडा दुरुस्तीसाठी पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात दरवर्षी तरतूद करण्यात येत असून सन २०१९-२०२० च्या अंदाजपत्रकात रुपये १,४०,००,०००/- एवढी रक्कमेची तरतूद केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे महानगरपालिकेने दिनांक ०५ जून, २००८ रोजी भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे पाठविला असून भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण करण्याकरीता मा.उच्च न्यायालयात प्रलंबित याचिका तात्काळ निकाली काढण्याच्यादृष्टीने शासनाने अद्यापपर्यंत आपली बाजू मांडण्यासाठी तज्ञ वकिलांची नेमणूकच केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी नागपूर विभागाच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक १७ डिसेंबर, २०२० व दिनांक ०३ जानेवारी, २०२१ रोजी व त्यापूर्वी अनेकवेळा निवेदने देवून तसेच दिनांक १७ फेब्रुवारी, २०२० रोजी विधानपरिषदेत विशेष उल्लेखाव्दारे सूचना उपस्थित केली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) व (२) होय, खरे आहे.

(३) या प्रकरणी पुणे महानगरपालिकेने दिनांक ०५/०६/२००८ रोजी भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविला आहे. तथापि, सदर वास्तुतील भाडेकरू/मालक यांनी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.३०९०/२०१० व ३५१९/२०१० दाखल केलेले असून या प्रकरणात मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशामुळे भूसंपादनाची कार्यवाही स्थगित करण्यात आली आहे.

मा.उच्च न्यायालयातील प्रलंबित असलेली प्रकरणे लवकरात लवकर निकाली होण्याच्या दृष्टीकोनातून राज्य शासनाची बाजू मांडण्यासाठी राज्याच्या विधि व न्याय विभागामार्फत दिनांक २९/०७/२०२० च्या पत्रान्वये महाअधिवक्ता, मा.उच्च न्यायालय यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) या प्रकरणी शासनाकडे वेळोवेळी विविध स्तरावरून निवेदने प्राप्त झालेली असून, सन २०२० च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये विशेष उल्लेखाव्दारे सूचना उपस्थित करण्यात आली होती. त्या संदर्भात सन्माननीय जनप्रतिनिधींना प्रकरणाची वस्तुस्थिती दिनांक ०१/१२/२०२० च्या पत्रान्वये अवगत करण्यात आलेली आहे.

(५) या प्रकरणी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केलेले भाडेकरू/मालक यांच्यासोबत चर्चा करून सर्व मान्य तोडगा काढण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी, पुणे तसेच पुणे महानगरपालिका, संचालक, पुरातत्व विभाग यांचेकडून एकत्रितपणे प्रयत्न करण्यात येत आहेत.

भिडेवाडा ही ऐतिहासिक वास्तू ताब्यात घेवून राष्ट्रीय दर्जाचे स्मारक करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे, पुणे महानगरपालिका तसेच शासनाकडून प्रयत्न करण्यात येत आहेत.

भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण होवून सदर वास्तू ताब्यात आल्यावर शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाकडून तेथे राष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यात येणार आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

नगर-मनमाड राज्य महामार्गाची दुरवस्था झाल्याबाबत

(१८) * ७३४३ डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगर-मनमाड राज्य महामार्ग क्र. ८ या अतिशय महत्वाच्या महामार्गाची दुरवस्था झाल्यामुळे उक्त ठिकाणी मोठ्या प्रमाणावर अपघात होवून वित्त व जीवितहानी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गाचे अहमदनगर ते सावळीविहीर-१६० व सावळीविहिर ते कोपरगाव-७५२जी असे राष्ट्रीय महामार्गात रूपांतर होणेबाबत माहे मे, २०१७ रोजी गॅजेट निघाले असून माहे मार्च, २०२० रोजी इंटरस्टेट रस्ते देखील झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर राष्ट्रीय महामार्गा अंतर्गत उक्त रस्ता ताब्यात घेऊन प्रलंबित काम सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) सन २०२० च्या पावसाळ्यातील अतिवृष्टीमुळे प्रश्नाधीन रस्ता क्षतिग्रस्त झाला होता. तथापि, क्षतिग्रस्त रस्त्यामुळे अपघात झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) केंद्र शासनाच्या क्र. १०५५ई, दिनांक १२/०३/२०२० रोजीच्या अधिसूचनेनुसार सिन्नर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्ग क्र.१६० भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे वर्ग करण्यात आला आहे. (एन्ट्रस्टमेंट) राष्ट्रीय महामार्ग सावळीविहिर ते कोपरगाव क्र.७५२-जी हा भाग भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे हस्तांतरण करण्याची प्रक्रिया प्रगतीत आहे.

(३) अहमदनगर ते सावळीविहीर फाटा (NH-१६०, ७५ कि.मी.) या लांबीमध्ये रस्ता सुधारणाकामी रुपये ४३०.११ कोटींच्या कामाची निविदा NHAI, अहमदनगर यांचेमार्फत दिनांक १२/०१/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच सावळीविहीर फाटा ते कोपरगाव (NH-७५२-जी, १०.५०० कि.मी.) या लांबीच्या नुतनीकरणा कामी रुपये २१.०० कोटी कामाची निविदा दिनांक १०/१२/२०२० रोजी राष्ट्रीय महामार्ग विभाग, नाशिक यांचेमार्फत काढण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

छत्रपती शिवाजी महाराज मंडई व ससून डॉक मधील मच्छीमारांचे स्थलांतर केल्याबाबत

(१९) * ७१०३ श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.सुरेश धस, डॉ.परिणय फुके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज महानगरपालिका मंडई व ससून डॉक मध्ये पारंपारिक व्यवसाय करत असणाऱ्या मच्छिमार भगिनींना बृहन्मुंबई महानगरपालिकेव्दारे जागा रिक्त करण्याची नोटीस देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्थलांतराला मच्छीमार बांधवांचा विरोध असल्यामुळे तत्कालीन आयुक्त श्री.प्रवीण परदेशी यांच्या दालनात बैठक घेऊन सदरचे मार्केट आहे तिथेच बांधून मच्छीमार महिलांचा समावेश करून पुनर्वसन करण्याचे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मार्केट इमारत धोकादायक असल्याने तिचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता असल्यामुळे उक्त इमारत बांधून त्या ठिकाणी मच्छीमार महिलांचे पुनर्वसन करून पुन्हा समावेश करून घेण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली करुन सदर आश्वासनाची पुर्तता करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) ससून डॉक मासळी मंडई मुंबई पोर्ट ट्रस्टच्या अखत्यारीत येत असल्याने ती बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून स्थलांतरीत करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

तसेच, छत्रपती शिवाजी महाराज मंडई बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत असून, तेथे पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या मच्छीमार भगिनींना जागा रिक्त करण्याची नोटीस महानगरपालिकेमार्फत देण्यात आली आहे.

तथापि, त्यानंतर झालेल्या बैठकीमधील निर्णयानुसार सदर मंडई पूर्णपणे रिक्त करण्याचा कोणताही प्रस्ताव नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) जोपर्यंत त्याच परिसरात नवीन इमारत बांधत नाही तोपर्यंत तेथील मच्छीमारांना छत्रपती शिवाजी महाराज मार्केटमध्येच त्यांची डागडुजी करुन ठेवण्यात येईल, तोपर्यंत सदरच्या नोटीशीला स्थगिती दिली आहे असे आदेश तत्कालीन आयुक्तांनी त्यांच्या दिनांक १९/०७/२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये दिले आहेत.

तथापि, सदरचे मार्केट आहे तेथेच बांधून मच्छीमार महिलांचा समावेश करुन त्यांचे पुनर्वसन करण्याचे आश्वासन दिले होते, हे खरे नाही.
(३) व (४) विकास नियोजन आराखडा-२०३४ नुसार छत्रपती शिवाजी महाराज मंडई, नगर भूमापन क्र. १५००, फोर्ट डिव्हिजन हा भूखंड महानगरपालिका कार्यालय म्हणून आरक्षित करण्यात आला आहे.

तथापि, सदर मंडईतील बाजार विभागाचे परवानाधारक त्याच परिसरात नव्याने विकसित होत असलेल्या महात्मा ज्योतिबा फुले मंडई (क्रॉफर्ड मार्केट) दुसरा टप्पा या इमारतीमध्ये सामावून घेण्यात येणार आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील वस्ती, इमारती आणि व्यावसायिक कंपन्यांमध्ये लेखा परिक्षण करण्याबाबत

(२०) * ६९९४ श्री.जयंत पाटील, श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील दाटीवाटीच्या वस्ती, इमारती आणि व्यावसायिक कंपन्यांमध्ये लागणाऱ्या आगींमधील सुमारे ८० टक्के आगी या शॉर्टसर्किटने लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामध्ये वर्षाला सुमारे ५५०० म्हणजेच महिन्याला ४५० आणि दररोज सुमारे १५ फायर कॉल महापालिकेच्या अग्निशमन दलाकडे येतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लाईटची व्यवस्था केल्यानंतर वर्षानुवर्षे कोणतेही लेखा परिक्षण किंवा देखभाल होत नसल्यामुळे वस्ती, इमारती आणि व्यावसायिक कंपन्यांमध्ये शॉर्टसर्किटने आगी लागण्याच्या प्रकारात दिवसेंदिवस वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने शॉर्टसर्किटने लागणाऱ्या आगीच्या घटना थांबविण्यासाठी शासनाकडून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २४ विभागांतर्गत कार्यरत असणाऱ्या अग्निसुरक्षा पालन कक्षाकडून तपासणी करताना, विद्युत जोडणीचे लेखा परिक्षण संबंधातील शासन मान्यताप्राप्त इलेक्ट्रिशीयन किंवा कॉन्ट्रॅक्टर यांचेकडून प्रमाणपत्र सादर करण्याची अट घालण्यात आली आहे.

सदोष वीज जोडणी/तारांमुळे उद्भवणाऱ्या घटनांना आळा घालण्यासाठी वीज पुरवठा करणाऱ्या संस्था/कंपनींना आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नोटीसेस देण्यात आल्या आहेत.

तसेच, ऊर्जा विभागाकडून प्राप्त माहितीनुसार, मुख्य विद्युत निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विद्युत निरीक्षक कार्यालये विद्युत पुरवठाकार कंपन्यांच्या सहाय्याने दरवर्षी ११ ते १७ जानेवारी दरम्यान राज्यभर विद्युत सुरक्षिततेचा प्रचार, प्रसार जनजागृती करण्यासाठी विद्युत सुरक्षा सप्ताह साजरा केला जातो. प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून झोपडपट्टी, निवासी व व्यापारी इमारतींमधील विद्युतदृष्टया असुरक्षित संचमांडण्या यांचे निरीक्षण करुन डी.पी.आर. बनविण्याचे काम सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती जिल्ह्यात घर खरेदी करणाऱ्या लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळण्याबाबत

(२१) * ६७२१ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.मोहनराव कदम, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत २.६७ लाख रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले असून अमरावती जिल्ह्यात घटक २ अंतर्गत घर खरेदी करणाऱ्या शेकडो लाभार्थ्यांना त्याचा लाभ अद्याप मिळाला नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती शहरात बहुतांश ठिकाणी विकासकांकडून लावण्यात आलेल्या प्लॅट विक्री फलकावर स्पष्टपणे २.६७ लाखांची सबसिडी देण्याचे आश्वासित केल्याने काही नागरिकांनी आश्वासनाच्या आहारी जावून पैशाची कमतरता असताना देखील घर खरेदी केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घर खरेदी करण्याकरीता संबंधित विकासकांनी कर्ज काढून दिले असून खरेदी व्यवहार पूर्ण झाल्यानंतर विकासक घर खरेदीदारांकडे दुर्लक्ष करुन तुम्ही संबंधित बँकेशी संपर्क करा अशी उर्मठ उत्तरे देत असल्याने घर खरेदीदार नागरिकांची एकप्रकारे फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड : (१), (२) व (३) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घटक क्र.२ कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे (CLSS) हा घटक पूर्णपणे केंद्र शासनाशी संबंधित असून त्याची राज्यात अंमलबजावणी हौसिंग ॲण्ड अर्बन डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड (HUDCO), राष्ट्रीय आवास बँक (NHB) व स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) या तीन नोडल बँकामार्फत होते व या घटकांतर्गत अनुदानाचे वाटपही बँकेमार्फत होते. सदर घटकांतर्गत राज्य शासनामार्फत कोणतीही कार्यवाही केली जात नाही. केंद्र शासनाच्या PMAYMIS या पोर्टलवरुन घेतलेल्या माहितीवरुन दिनांक २२/०२/२०२१ पर्यंत राज्यात २,७८,७५८ लाभार्थ्यांना घटक क्र.२ अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) चा लाभ मिळाला असून त्यापैकी अमरावती जिल्ह्यात २२२० लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत लाभ मिळाला आहे. या संबंधित तक्रारींचे निराकरण करण्यासाठी नोडल बँकांना आवश्यक सूचना देण्याबाबत राज्य प्रकल्प संचालक, प्रधानमंत्री आवास योजना यांना कळविण्यात आले आहे.

(४) व (५) प्रश्न उदभवत नाही.

राज्यातील नगरपालिका व महानगरक्षेत्रातील शाळांना निवासी दराने कर आकारणी करण्याबाबत

(२२) * ७१७० श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, डॉ.रणजित पाटील : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगरपालिका व महानगरक्षेत्रातील मराठी, उर्दू व हिंदी माध्यमांच्या शाळांना निवासी दराने कराची आकारणी केली जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळा ह्या धर्मादाय संस्था कायद्यांतर्गत नोंदणीकृत असल्याने व शिक्षक कर्मचाऱ्यांच्या वेतनाशिवाय त्यांना पुरक अनुदान नसल्यामुळे निवासी दराने कर आकारणी करण्याकरीता होत असलेल्या मागणीबाबत शासनाने कोणता धोरणात्मक निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) व (२) ज्या शैक्षणिक संस्था ह्या धर्मादाय संस्था कायद्यांतर्गत नोंदणीकृत करण्यात आलेल्या आहेत तसेच शाळेची स्वतंत्र इमारत असलेल्या अशा शैक्षणिक संस्थांच्या मालमत्तांना निवासी दराने मालमत्ता कराची आकारणी करण्यात येते.

मात्र ज्या शैक्षणिक संस्थांनी शैक्षणिक कामाव्यतिरिक्त जागेचा वापर वाणिज्य कामासाठी केला असल्यास तेवढ्या वाणिज्य भागास वाणिज्य दराने कर आकारणी केली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मानखुर्द, गोवंडी व शिवाजीनगर, मुंबई परिसरातील बेकायदेशीर नर्सिंग होम व रुग्णालयांची चौकशी करण्याबाबत

(२३) * ६६४१ श्री.विलास पोतनीस : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत सुमारे १३०० हून अधिक नोंदणीकृत खाजगी रुग्णालये आणि नर्सिंग होम असून मानखुर्द, गोवंडी व शिवाजीनगर परिसरातील ४० हून अधिक नर्सिंग होम व रुग्णालयांना अग्निशमन दल आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कारखाने विभागाचे 'ना-हरकत' प्रमाणपत्र प्राप्त नसल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची गंभीर दखल घेवून शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार सदर बेकायदेशीर नर्सिंग होम व रुग्णालयांवर कोणती कारवाई केली वा प्रस्तावित करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१), (२) व (३) मुंबईतील मानखुर्द, गोवंडी व शिवाजीनगर परिसरात एकूण ४१ नोंदणीकृत नर्सिंग होम्स/रुग्णालये आहेत.

अग्निसुरक्षिततेच्या दृष्टीने एम/पूर्व विभागातील ४१ नोंदणीकृत नर्सिंग होम/हॉस्पिटलपैकी ३५ नोंदणीकृत नर्सिंग होम/हॉस्पिटल यांची तपासणी अग्निशमन दलामार्फत करण्यात आली. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे:-

- २१ नर्सिंग होम्स/हॉस्पिटल यांनी अग्निसुरक्षेच्या अटी व शर्तींची पुर्तता न केल्यामुळे त्यांना महाराष्ट्र आगप्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ अन्वये नोटीस बजाविण्यात आली आहे.

  सदर नर्सिंग होम्स/हॉस्पिटल अग्निसुरक्षा प्रमाणपत्र सादर करीत नाहीत तोपर्यंत नोंदणीचे नुतनीकरण न करण्याबाबत वैद्यकीय आरोग्य अधिकारी (एम पूर्व) यांना अग्निशमन दलामार्फत कळविण्यात आले आहे.
- ५ नर्सिंग होम बंद आढळले व १ नर्सिंग होम नमूद पत्त्यावर आढळले नाही.
- ८ नर्सिंग होम्स/हॉस्पिटल यांनी मुंबई अग्निशमन दलाचे ना-हरकत प्रमाणपत्र उपलब्ध केले नसल्याने अग्निसुरक्षा प्रमाणपत्र प्राप्त

करेपर्यंत त्यांची नोंदणीपत्र निलंबित करण्याबाबत वैद्यकीय आरोग्य अधिकारी (एम पूर्व) यांना अग्निशमन दलामार्फत कळविण्यात आले आहे.

याव्यतिरिक्त उर्वरित ६ नर्सिंग होम्स/हॉस्पिटल यांची तपासणी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलामार्फत करण्यात येत आहे.

माहे ऑगस्ट, २०१८ पासूनच्या महानगरपालिकेच्या सुधारित धोरणानुसार अग्निसुरक्षा विषयक अटी व शर्तींच्या अनुपालनाबाबत अग्निशमन दलाकडून पूर्तता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर नर्सिंग होमची नोंदणी अथवा नुतनीकरण केली जाते. त्यापूर्वीच्या सर्व नर्सिंग होम्सला अग्निसुरक्षेबाबतच्या अटीचे अनुपालन करण्याकरीता ३ महिन्याचा अवधी देण्यात आला आहे. सदर कालावधीत पुर्तता न केल्यास नोंदणी रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

नर्सिंग होम कायद्यामध्ये इमारत व कारखाने विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेण्याची तरतूद नाही.

मराठा आरक्षणासाठी बलिदान देणाऱ्यांच्या कुटुंबियांना शासकीय नोकरी तसेच सहाय्यता निधी मिळण्याबाबत

(२४) * ७४४५ श्री.विनायकराव मेटे : तारांकित प्रश्न क्रमांक १९९८ ला दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मराठा आरक्षणासाठी बलिदान देणाऱ्यांच्या कुटुंबातील एकाला शासकीय नोकरी आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून रुपये दहा लक्ष देण्याची घोषणा झाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरक्षणाच्या मागणीसाठी बलिदान दिलेल्या श्री.अभिजित देशमुख यांच्याच कुटुंबियांना रुपये पाच लक्ष रोख स्वरुपात देण्यात आले असून उर्वरित कुटुंबियांना उक्त रक्कम अदा करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पिडीत कुटुंबियांना एसटी महामंडळामध्ये तसेच इतर शासकीय नोकरी देण्याबाबत देण्यात आलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्यात आली आहे काय, आतापर्यंत किती कुटुंबियांना शासकीय नोकरी देण्यात आली आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उध्दव ठाकरे : (१) नाही, राज्यात मराठा आरक्षणासाठी बलिदान देणाऱ्यांना कुटुंबातील एकाला शासकीय नोकरी आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून रुपये दहा लक्ष देण्याबाबत माहे ऑगस्ट, २०१८ च्या दरम्यान घोषणा झाल्याचे आढळून येत नाही.

(२) या आंदोलनातील एकूण १७ आंदोलकांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अर्थसहाय्य दिल्याचे अभिलेखावरुन दिसून येते.

(३) मराठा आंदोलनात मृत्यूमुखी पडलेले उस्मानाबाद जिल्ह्यातील एका अवलंबितास राज्य परिवहन महामंडळात नियुक्ती देण्यात आली असून परभणी जिल्ह्यातील ०२ अवलंबितास नेमणूक देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद महानगरपालिका निधी आणि स्थगित निधी मधून केलेल्या कामांची चौकशी करण्याबाबत

(२५) * ६६१५ श्री.अंबादास दानवे : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिका निधी आणि स्थगित निधी मधून (Deferred Payment) करण्यात आलेल्या १५ रस्त्यांच्या कामांची तपासणी /चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद महानगरपालिका निधी आणि स्थगित निधी मधून (Deferred Payment) स्टेट बँक ते ज्योतीनगर दशमेशनगरला जोडणारा रस्ता, सव्हेन हील ते सूत गिरणी चौक, गजानन महाराज मंदिर ते

जयभवानी नगर चौक, संत तुकोबानगरी ते राज अपार्टमेंट, कामगार चौक ते महालक्ष्मी चौक, सतीश पेट्रोलपंप ते निराला बाजार, टीव्ही सेंटर चौक, राजे छत्रपती चौक ते कॉर्नर आदि १५ रस्त्यांच्या कामामध्ये दुय्यम दर्जाचे साहित्य वापरण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त १५ रस्त्यांच्या कामांची चौकशी पूर्ण होऊन अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, चौकशी अहवालानुसार दोषी आढळून आलेल्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) औरंगाबाद शहरातील एकूण १३ रस्त्यांची कामे स्थगित निधी (Deferred Payment) मधून मंजूर करण्यात आलेली असून, सर्व रस्त्यांची कामे सन २०१५ मध्ये पूर्ण झालेली आहेत.

सदर रस्त्यांची कामे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पीएमसी) यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली व देखरेखीखाली करण्यात आली आहेत.

त्याचप्रमाणे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद व Vigillence & Quality Control या विभागामार्फत प्रस्तुत रस्त्यांच्या कामाचा दर्जा व गुणवत्तेबाबत तपासणी करुन घेण्यात आलेली असून, प्राप्त झालेला अहवाल समाधानकारक असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सोयी सुविधांच्या विकासाकरीता रुपये २४.३३ कोटी इतके विशेष अनुदान शासनाने मंजूर केलेले होते.

सदर अनुदानाच्या रकमेमधून शहरातील एकूण ५ रस्त्यांची व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट करण्याची कामे करण्यात आलेली आहेत.

सदर कामे महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या मे.ए.पी.इंजिनिअर्स, औरंगाबाद यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली व देखरेखीखाली करण्यात आलेली आहेत. तसेच या प्रकल्पांतर्गत रस्त्यांच्या कामाची तृतीयपक्ष तांत्रिक लेखा परिक्षणही करण्यात आलेले असून, त्याबाबतचा अहवाल समाधानकारक असल्याचे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महापालिकेतील सुरक्षारक्षकांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत

(२६) * ६६५९ श्री.महादेव जानकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेच्या मालमत्तांच्या सुरक्षेसाठी सुरक्षारक्षक पुरवठा करण्याकरीता महाराष्ट्र राज्य सुरक्षारक्षक मंडळाबरोबर केलेल्या कराराची मुदत संपुष्टात येऊनही उक्त कराराचे नुतनीकरण न झाल्याने सदर मंडळाचे ३०० सुरक्षारक्षक गत चार महिन्यापासून वेतनापासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महापालिकेच्या विविध रुग्णालये व कार्यालयांच्या सुरक्षेसाठी ईगल सिक्युरिटीचे तीन हजार खाजगी सुरक्षारक्षक घेण्याचा निर्णय शासनाने घेतला होता व याकरीता सन २०१९ मध्ये २२१ कोटी रुपयांची निविदाही मंजूर करण्यात आली होती, असे असतानाही सुरक्षारक्षकांचे वेतन प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सुरक्षारक्षकांचे वेतन प्रलंबित असल्यामुळे त्यांच्यात असंतोष निर्माण झाला असून त्यांनी आंदोलन करण्याचा इशाराही दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने निविदा मंजूर केली असूनही सुरक्षारक्षकांचे वेतन प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनस्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१), (२), (३), (४) व (५) सुरक्षारक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचेकडून उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णयानुसार ई-निविदा न मागविता सुरक्षारक्षक नियुक्त करण्यात आले होते. सदर सुरक्षारक्षकांचा करार कालावधी दिनांक १४/०९/२०२० रोजी संपुष्टात

येणार होता. तथापि, कोरोना संसर्गाच्या प्रादुर्भावामुळे दिनांक २२ मार्च, २०२० पासून लॉकडाऊन सुरु झाल्यामुळे वाढीव कालावधीचा प्रस्ताव दिनांक २४/११/२०२० रोजी स्थायी समितीच्या मान्यतेकरीता सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्ताव फेरविचाराकरीता पाठविण्यात आल्याने नव्याने प्रस्ताव तयार करुन दिनांक १०/०२/२०२१ रोजी स्थायी समितीच्या मान्यतेकरीता सादर करण्यात आला आहे.

सन २०१९ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध आस्थापनांना सुरक्षारक्षक पुरविण्यासाठी ३२.९४ कोटी व रुपये १९८.०३ कोटी अशा एकूण रुपये २३०.९७ कोटी इतक्या रकमेच्या दोन ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या.

सदर दोन्ही निविदांच्या अनुषंगाने अनेक तक्रारी प्राप्त झाल्यामुळे तसेच मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्रमांक ९१७७/२०२० दाखल झाल्यामुळे सदर दोन्ही ई-निविदा प्रलंबित ठेवण्यात आल्या आहेत.

उपरोक्त नमूद प्रलंबित निविदांचा सुरक्षारक्षक मंडळ बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा यांच्या प्रलंबित वेतनाशी कोणताही संबंध नाही.

तसेच सुरक्षारक्षकांचे वेतन प्रलंबित असल्याने त्यांच्यात असंतोष निर्माण होऊन त्यांनी आंदोलन करण्याचा इशारा दिलेला नाही, असे महानगरपालिकेने कळविले आहे.

अकोला महानगरपालिकेत गैरव्यवहार होत असल्याबाबत

(२७) * ६७११ श्री.गोपिकिशन बाजोरीया, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.संजय दौंड : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेतील सुलभ शौचालयासाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून मोठ्या प्रमाणावर निधी प्राप्त झाला असून नागरीकांना वैयक्तिक शौचालय बांधून देण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात येऊन त्यासाठी ४५० लाभार्थ्यांची निवड करुन बांधकाम करण्यात आलेल्या घरगुती शौचालयाच्या

कामामध्ये S.B.M. कडून निर्देशित केलेल्या गाईड लाईनचे उल्लंघन करण्यात आले असून राज्य व केंद्र शासनाचे कोणतेही निकष न लावता तत्कालीन संबंधित अधिकाऱ्यांनी निधीचा वापर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाभार्थ्यांचे जियो टॅगिंससुध्दा न करता जुन्या शौचालयास रंगरंगोटी, किरकोळ दुरुस्ती करुन व त्यासाठी जुन्या शौचालयधारकास रुपये ५०००/- देऊन त्यांचे शौचालयाचे छायाचित्रे मनपाला सादर करण्यात येऊन महानगरपालिका प्रशासनाची व पर्यायाने शासनाची फसवणूक करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, तसेच शौचालय बांधकामाची रक्कम लाभधारकांच्या खात्यामध्ये जमा न करता त्यांच्या प्रतिनिधींच्या खात्यामध्ये २८७.४३ लक्ष रक्कम बेकायदेशिररित्या जमा करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अकोला महानगरपालिकेमध्ये विविध विकास कामासाठी गत तीन वर्षात जवळपास १८५ कोटी रुपये १४ व्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त झाले असून सदर निधीचा विनियोजन कोणतेही कायदेशीर ठराव न घेता तातडीने तसेच महानगरपालिकेच्या आमसभेमध्ये वेळेवर येणाऱ्या विषयामध्ये सदर खर्चाला मान्यता देण्यात येवून दिनांक ०१ एप्रिल, २०१७ ते आजपावेतो घेण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेच्या ठरावामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याची तक्रार महापालिकेतील नगरसेवकांनी वारंवार आयुक्त व जिल्हाधिकारी, अकोला तसेच शासनाकडे केली असून सभेमध्ये घेण्यात आलेले सर्व आर्थिक व महत्वाचे ठराव व विषय वेळेवर येणाऱ्या विषयामध्ये घेवून कोणतीही चर्चा न करता व नगरसेवकांना विश्वासात न घेता घाई घाईने पारित करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) व (२) महाराष्ट्र विधानपरिषद विनंती अर्ज समितीसमोरील दिनांक १३/०८/२०१९ व दिनांक ११/०२/२०२० च्या साक्षीत या बाबी निदर्शनास आल्या होत्या.

महानगरपालिकेने यासंदर्भात, वेळेत परिपूर्ण अहवाल न दिल्याने महाराष्ट्र विधानपरिषद विनंती अर्ज समितीने सन्माननीय लोकप्रतिनिधी श्री.गोपिकिशन बाजोरिया (गट प्रमुख) व अन्य चार विधानपरिषद सदस्य यांची एक उपसमिती पुनर्तपासणी करण्यासाठी दिनांक २३/०२/२०२० रोजी नियुक्त केली आहे.

या उपसमितीत विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती व मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती यांची विशेष निमंत्रित म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

समितीच्या कार्यकक्षेत शौचालय कामाच्या अनियमिततेचा मुद्दा समाविष्ट आहे.

सदर उपसमितीने विधानपरिषद विनंती अर्ज समितीस अहवाल सादर करावयाचा आहे.

यासंदर्भातील विधानपरिषद विनंती अर्ज समितीच्या शिफारशी प्राप्त झाल्यावर त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(३), (४) व (५) सन २०१५-२०१६ ते २०१९-२०२० या दरम्यान, वित्त आयोगाच्या रकमेपोटी रुपये १८५,००,४०,८७९/- इतकी रक्कम महापालिकेस प्राप्त झालेली आहे.

दिनांक ०१/०४/२०१७ ते आजमितीपर्यंतचे ठराव मंजूर होतांना, महानगरपालिका अधिनियमातील तरतुदींचे पालन न झाल्याने मागील ०३ वर्षाच्या ठरावांची चौकशी करण्याची मागणी सन्माननीय लोकप्रतिनिधींनी केली होती. त्यास अनुसरुन विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडे दिनांक २४/१२/२०२० च्या शासन पत्रान्वये याबाबतची चौकशी सोपविण्यात आलेली आहे.

दिनांक ०२/०९/२०२० च्या महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत गोंधळात चर्चेविना तर दिनांक ०२/०७/२०२० च्या स्थायी समितीच्या सभेत मतदानाची मागणी होवूनही मतदान न घेता अनुक्रमे १७ आणि ०३ ठराव

मंजूर झाल्याची तक्रारही शासनास प्राप्त झाली होती. याबाबतचा विभागीय आयुक्त, अमरावती यांचा अहवाल प्राप्त झाल्यावर वरील सर्व ठराव निलंबित करण्याचा निर्णय दिनांक २४/१२/२०२० च्या शासन निर्णयान्वये महानगरपालिकेस कळविण्यात आला आहे.

रत्नागिरी येथील दिवाणी न्यायालयाची नवीन इमारत अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(२८) * ७२९० श्री.रामदास कदम : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी येथील दिवाणी न्यायालयाची नवीन इमारत अपूर्णावस्थेत असून उक्त ठिकाणी न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करण्याकरीता विधी व न्याय विभाग, शासन निर्णय, दिनांक २५ जून, २०१० अन्वये रुपये ३३१.५८ लक्ष इतक्या किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीच्या बांधकामांच्या किंमतीत वाढ झाल्याने व आवार भिंत, वाहनतळ, बगीचा व सुशोभिकरण या बाबींचा अंदाजपत्रकात समावेश करुन सदर बांधकामाचा रुपये ४.८२ कोटी इतक्या किंमतीचा सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालयामार्फत शासनास सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास शासनाच्या व्यय अग्रक्रम समितीने दिनांक १९ ऑक्टोबर, २०२० रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिलेली असून, त्यानुसार शासन निर्णय निर्गमित करण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(४) असल्यास, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर दिवाणी न्यायालयाची इमारत त्वरित पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उध्दव ठाकरे : (१) होय, हे खरे आहे.

दापोली, जिल्हा रत्नागिरी येथे न्यायालयीन इमारत बांधणेकरीता विधि व न्याय विभाग, शासन निर्णय, दिनांक २५ जून, २०१० अन्वये रुपये ३,३१,५८,०००/- इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

बांधकामाच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे मा.उच्च न्यायालय यांच्या दिनांक १९ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या पत्रान्वये रुपये ४.८२ कोटी इतक्या अंदाजित रकमेचा सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे.

(३) होय.

सदर प्रस्तावास व्यय अग्रक्रम समितीच्या दिनांक १९ ऑक्टोबर, २०२० रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिलेली असून, विधि व न्याय विभाग, शासन निर्णय, दिनांक २५ जानेवारी, २०२१ अन्वये रुपये ४,८२,४१,२३२/- इतक्या रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

(४) विधानमंडळाच्या सन २०२१-२०२२ च्या पहिल्या अधिवेशनात सदर काम अर्थसंकल्पीत करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. सदर काम अर्थसंकल्पीत झाल्यावर, काम पूर्ण करण्याकरीता निधीचे वितरण करण्यात येणार आहे.

(५) विलंब झालेला नाही.

राज्यात जात वैधता प्रमाणपत्राअभावी बडतर्फ झालेल्या कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत घेण्याबाबत

(२९) * ७१११ श्री.कपिल पाटील : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ४१७५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र तपासणी समितीने अवैध ठरवून रद्द केल्यानंतर मूळच्या अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्याबाबतचा दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयाने राज्यात संभ्रम निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात मा.सर्वोच्य न्यायालयाने कर्मचाऱ्यांना सेवेतून काढण्याबाबत कोणताही आदेश दिलेला नसून अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची सेवा त्यांच्या निवृत्तीपर्यंत सुरु ठेवावी किंवा कसे तसेच त्यांना पदोन्नती, वार्षिक वेतनवाढ, सेवानिवृत्ती वेतन इ. लाभ देण्यात यावे किंवा कसे याबाबत निर्णय घेण्याबाबत मा.अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समितीच्या शिफारशी शासनास प्राप्त झाल्या आहेत काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उध्दव ठाकरे : (१) व (२) मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील क्र.८९२८/ २०१५ (चेअरमन ॲण्ड मॅनेजिंग डायरेक्टर, एफसीआय आणि इतर विरुध्द जगदिश बालाराम बहिरा व इतर) व इतर याचिका यामध्ये दिनांक ६/०७/२०१७ रोजी मागास जातींना असलेल्या आरक्षणाच्या आधारे शासकीय सेवेत दाखल झालेल्या व त्यानंतर जातीचे दावे अवैध ठरलेल्या व्यक्तींना शासकीय सेवेत संरक्षण देय ठरत नाही, असा निर्णय दिलेला आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी विभागाच्या दिनांक २१/१२/२०१९ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत नियुक्त झालेल्या व सदर जातीचे प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्याबाबतचे निदेश देण्यात आलेले आहेत.

अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना सेवा विषयक लाभ/सेवा निवृत्ती विषयक लाभ अनुज्ञेय करण्यासंदर्भात शासनास शिफारस करण्यासाठी दिनांक १५/०६/२०२० च्या शासन निर्णयान्वये मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गटाची स्थापना करण्यात आलेली आहे.

(३) सदर अभ्यास गटाने अद्याप शासनास अहवाल सादर केलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र समृध्दी मार्गाच्या पहिल्या टप्प्यातील रस्त्याचे काम संथगतीने सुरु असल्याबाबत

(३०) * ७४४१ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र समृध्दी मार्गाच्या नागपूर ते शिर्डी या पहिल्या टप्प्यातील रस्त्यावरुन दिनांक १ मे, २०२१ रोजी वाहतूक सुरू करण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने सदर रस्त्याच्या कामाची गती वाढविण्याची आवश्यकता असतानाही उक्त रस्त्याचे काम संथगतीने सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापूर्वी घोषणा केल्याप्रमाणे दिनांक १ मे, २०२१ रोजी प्रत्यक्ष नागपूर ते शिर्डी वाहतूक सुरु होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही. सद्य:स्थितीत महामार्गाचे बांधकाम युध्द पातळीवर प्रगतीत असून सदर टप्पा नमुद तारखेस वाहतूकीसाठी खुला करण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

(३) ईपीसी कंत्राटदारास प्रकल्प दिलेल्या विहित वेळेत पूर्ण करण्याबाबत सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. वाहतूक नियोजित दिनांकापासून सुरु करण्यासाठी योग्य ते नियोजन करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे व कल्याण बसस्थानकांचे आधुनिकीकरण करण्याबाबत

(३१) * ७४६० श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अमोल मिटकरी, श्री.संजय दौंड : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील निवडक महापालिकांमध्ये ठाणे व कल्याण या दोन्ही महापालिकांचा केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी योजनेंतर्गत समावेश करुन शहरातील विकास कामाकरीता वेळोवेळी या दोन्ही महापालिकांना अनुदान वितरित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्मार्ट सिटी योजनेंतर्गत प्राप्त अनुदानातून अन्य विकास कामांसह शहरातील राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांचे अद्ययावतीकरण व आधुनिकीकरण करुन या दोन्ही स्थानकामध्ये स्मार्ट सिटी योजनेच्या माध्यमातून बदल करण्याच्या कामासाठी प्राप्त अनुदानित रक्कमेचा विनियोग करण्याचे दोन वर्षापूर्वी घोषित करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे ठाणे (रेल्वे स्टेशन जवळील बस स्थानक) व कल्याण या दोन्ही बसस्थानकांतील इमारतीची दुरवस्था होऊन इमारतींना अनेक ठिकाणी तडे जाऊन इमारतीच्या छताचे प्लास्टर देखील निखळल्यामुळे पावसाळयात दोन्ही बसस्थानकाच्या इमारतीमधून पाणी गळती होत असूनही प्राप्त अनुदानाचा विनियोग करण्यात येत नसल्याचे दिनांक ६ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे तसेच शासनाने केलेल्या घोषणेनुसार ठाणे व कल्याण या दोन्ही बसस्थानकांमध्ये स्मार्ट सिटी योजनेच्या माध्यमातून बदल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) होय, हे खरे आहे.
(२) कल्याण स्टेशन परिसर सुधारणा करणे' या प्रकल्पांतर्गत अस्तित्वातील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कल्याण बस स्थानकाचा पुनर्विकास करण्याचे स्मार्ट कल्याण-डोंबिवली डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. अंतर्गत प्रस्तावित आहे.

ठाणे स्मार्ट सिटी लि. अंतर्गत प्रकल्पामध्ये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ठाणे बस स्थानकाचा अद्ययावतीकरण व आधुनिकीकरणाच्या कामाचा समावेश नाही.
(३) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत ठाणे व कल्याण रेल्वे स्टेशन येथील राज्य परिवहन बस स्थानक इमारतीची आवश्यक असलेली दुरुस्तीची कामे करून घेण्यात आलेली आहेत.
(४) व (५) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने अटी व शर्तींच्या अधीन राहून बस स्थानक पुनर्विकास करणेकरीता स्मार्ट कल्याण-डोंबिवली डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. मान्यता दिली आहे.

या अनुषंगाने पुनर्विकास आराखडे बनविणे सुरू असून या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला द्यावयाचे वाणिज्य कॉम्प्लेक्स मधील वाटप निश्चित केल्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्याचे स्मार्ट कल्याण-डोंबिवली डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. चे नियोजन आहे.

ठाणे बस स्थानकाचे अद्ययावतीकरण व आधुनिकीकरण करणे या कामाचा ठाणे स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत समावेश नाही.

परभणी-गंगाखेड (ता.गंगाखेड, जि.परभणी) महामार्गाची दुरुस्ती करण्याबाबत

(३२) * ७१४७ श्री.विप्लव बाजोरिया : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी-गंगाखेड (ता.गंगाखेड, जि.परभणी) महामार्गाचे काम शासकीय योजनेतून मंजूर झाले असून सदर रस्त्याचे काम सुरू असतानाच महातपुरी फाटा ते देठणा दरम्यानच्या रस्त्याला जागोजागी तडे गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदारावर परभणी राष्ट्रीय महामार्गाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी कोणतीही कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी कंत्राटदारावर कारवाई करुन सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१) अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) तडे गेलेल्या रस्त्याचे काम कंत्राटदाराच्या स्वखर्चाने मानकानुसार गुणवत्तापूर्वक पुन:श्च नव्याने करुन घेण्यात येत आहे.

राज्यात कोरोना साथीच्या काळात मृत्यू झालेल्या पत्रकारांच्या कुटुंबियांना मदत देण्याबाबत

(३३) * ७५११ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ५४ पत्रकारांचा कोरोना साथीच्या काळात मृत्यू झाला असून शासनाने कोरोना साथीच्या काळात ज्या पत्रकारांचा मृत्यू झाला आहे अशा पत्रकारांच्या कुटुंबियांना मदत देण्याची घोषणा केल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोनामुळे मृत्यू झालेल्या पत्रकारांच्या कुटुंबियांना शासनाकडून कोणतीही मदत देण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर मृत पत्रकार बांधवांच्या कुटुंबियांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उध्दव ठाकरे : (१) नाही, मात्र मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा यांनी दिनांक ६/०८/२०२० रोजी तसेच मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य यांनी दिनांक ९ जून, २०२० च्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री यांना प्रसार माध्यमाच्या प्रतिनिधीना रुपये ५० लक्षचे विमा कवच/सानुग्रह अनुदान मंजूर करण्याबाबत विनंती केली आहे.

(२) व (३) आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक २८/०३/२०२० च्या आदेशानुसार आरोग्य सेवा देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना कोरोनाची बाधा होवून मृत्यू ओढवल्यास इन्शुरन्स कंपनीच्या अपघात विमा योजनेंतर्गत रुपये ५० लक्ष इतकी रक्कम अनुज्ञेय आहे. यामध्ये खाजगी रुग्णालयांचे कर्मचारी/सेवा निवृत्त कर्मचारी/कंत्राटी कर्मचारी/रोजंदारीवरील कर्मचारी/बाह्ययंत्रणेव्दारे उपलब्ध करुन घेतलेले कर्मचारी, आशा, अंगणवाडी कर्मचारी, केंद्र, राज्य आणि स्थानिक स्वराज्य संस्था इ. सर्व प्रकारच्या रुग्णालयामध्ये कार्यरत कर्मचारी यांचा समावेश आहे. सदर आदेशाच्या पार्श्वभूमीवर नियमित झालेल्या वित्त विभागाच्या दिनांक २९/०५/२०२० च्या शासन निर्णयामध्ये वृत्त पत्रकार हे आरोग्य सेवा देणारे अधिकारी/कर्मचारी नसल्यामुळे त्यांना विमा कवच/सानुग्रह अनुदान लागू होत नसल्याचे नमूद आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील वृत्तपत्र विक्रेत्यांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याबाबत

(३४) * ७५४२ श्री.सदाशिव खोत : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वृत्तपत्र विक्रेत्यांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याकरीता सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन मा.गृहनिर्माण मंत्री यांनी दिल्याचे माहे डिसेंबर, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विपरीत परिस्थितीत प्रामाणिकपणे व्यवसाय करणारा हा घटक दुर्लक्षित राहिल्याने सदर वृत्तपत्र विक्रेत्यांना हक्काची घरे मिळवून देण्याची मागणी मुंबई, ठाणे जिल्हा वृत्तपत्र विक्रेता एकीकरण समितीचे सदस्य आणि ठाणे जिल्हा वृत्तपत्रविक्रेता संघाचे सरचिटणीस, श्री.अजित पाटील यांनी शिष्टमंडळासमवेत मा.गृहनिर्माण मंत्री यांना एका निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर 'वृत्तपत्र विक्रेत्यांना' परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड : (१) व (२) अंशत: खरे आहे.

मुंबई-ठाणे वृत्तपत्र विक्रेता एकीकरण समिती यांनी "वृत्तपत्र विक्रेत्यांना परवडणारी घरे उपलब्ध करुन देण्याबाबत" मा.मंत्री, गृहनिर्माण यांच्याकडे दिनांक २२/१२/२०२० रोजी निवेदन सादर केले आहे.

(३) म्हाड अधिनियम १९७६ तसेच, त्यानुषंगाने तयार करण्यात आलेल्या विनियम/नियमातील तरतूदींनुसार म्हाडाच्या धोरणानुसार सर्वसामान्य जनतेसाठी (नियमाप्रमाणे आरक्षण ठेऊन) गृहनिर्माण योजना राबविण्यात येतात व सदर योजनेतील गाळे सोडत पध्दतीने वितरित करण्यात येतात. वृत्तपत्र विक्रेता गटाकरीता म्हाड अधिनियम/विनियमामध्ये आरक्षण ठेवण्यात आलेले नाही. तसेच, म्हाड (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण आणि

सदनिकांची अदलाबदल) विनियम १९८१ च्या विनियम १३ (२) अंतर्गत शासनाच्या मान्यतेने म्हाडाकडून विशिष्ट गटाकरीता गृहनिर्माण योजना राबविण्याची तरतूद आहे. यानुषंगाने शासनाने निश्चित केलेल्या गटांमध्ये वृत्तपत्र विक्रेत्यांच्या गटाचा समावेश नाही. तसेच, म्हाड प्राधिकरणाकडून या अनुषंगाने कोणताही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्ह्यातील झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासाच्या कामाबाबत

(३५) * ६५४१ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्रात झोपडपट्ट्यांची संख्या ५५७ असून त्यात असणाऱ्या सुमारे २ लाख २६१ झोपड्यांपैकी घोषित झोपडपट्ट्यांची संख्या २८६, अघोषित झोपडपट्ट्यांची संख्या २७१, झोपडपट्टीतील एकूण पूररेषेत येणाऱ्या झोपड्यांची संख्या ५७ असून पूररेषेत येणाऱ्या झोपडपट्टीतील लोकसंख्या अंदाजे एक लाखाहून जास्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक झोपडपट्ट्या मुठा-मुळा आणि पवना नदी पात्रातील लाल व निळ्या पूररेषेमुळे बाधित झाल्यामुळे त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सुटावा यासाठी निळ्या पूररेषेमध्ये येत असलेल्या, तथापि, पात्र असलेल्या झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास करण्यास मान्यता मिळावी असा प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने शासनाकडे माहे नोव्हेंबर, २०२० च्या तिसऱ्या आठवड्यात पाठविलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड : (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) दिनांक २४/०६/२०२० रोजी मा.मंत्री (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीतील निर्णयानुसार निळ्या व लाल पुररेषांमुळे बाधित असलेल्या झोपडपट्टयांचे पुणे मनपाच्या विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. १३.३(I) नुसार नदीच्या काठापासून निळ्या पुररेषेपर्यंत अस्तित्वात असलेल्या अधिकृत मालमतांचा पुनर्विकास अनुज्ञेय करण्याच्या तरतुदीनुसार नदीकाठापासून निळ्या रेषेपर्यंतच्या पुनर्विकासास पात्र असलेल्या झोपडपट्टया या अधिकृत समजुन त्यानुसार त्यांच्या पुनर्विकास बांधकाम प्रकल्पांना देखील मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव झोपुप्रा, पुणे यांनी या विभागाकडे दिनांक ११/११/२०२० रोजी सादर केला होता.

सदरहू प्रस्ताव नगर विकास विभागाने दिनांक ०२/१२/२०२० रोजी प्रसिध्द केलेल्या DCPR मधील तरतुदीनुसार व प्रकरण मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे न्यायप्रविष्ट असल्याने, अमान्य करण्यात आला आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

राज्यातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत

(३६) * ६८१२ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास होण्याकरीता शासनाने प्रोत्साहनात्मक चटईक्षेत्रफळाचे वितरण करताना सदर लाभ जुन्या व मोडकळीस आलेल्या म्हाडा वसाहतींना लागू करण्यात आले नसल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झोपडपट्टी पुनर्विकासासाठी असलेल्या ३३(१०) या नियमावलीत विकासकाला प्रत्येक एक चौरस फुटामागे १.३ चौरस फुट इतके चटई क्षेत्रफळ खुल्या विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात आले असून म्हाडा पुनर्विकासाच्या

३३(५) या नियमावलीत एक चौरस फुटामागे फक्त ००.६ इतकेच चटई क्षेत्रफळ खुल्या विक्रीसाठी मिळत असल्यामुळे विकासक या वसाहतींच्या पुनर्विकासासाठी पुढे येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सदर चटई क्षेत्रफळ वितरणाचा लाभ जुन्या व मोडकळीस आलेल्या म्हाडा वसाहतींना लागू न करण्याची कारणे काय आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड : (१) व (२) मुंबई मंडळाच्या अभिन्यासातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीचा पुनर्विकास होण्याकरीता, बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ (DCPR-२०३४) मधील वि.नि.नि. ३३(५) अन्वये संस्थेस ३.० च.क्षे.नि. नुसार मंजुरी देतांना संस्थेच्या सभासदांना पुनर्वसन क्षेत्र DCPR-२०३४ च्या तरतुदीनुसार अस्तित्वातील चटई क्षेत्रफळ +३५% इतके किंवा किमान ३५.०० चौ.मी. जे जास्त असेल ते चटई क्षेत्रफळ प्राप्त होते.

विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मध्ये असलेल्या तरतुदीनुसार ४००० चौ.मी. पर्यंतच्या भूखंडाकरीता ३.०० च.क्षे.नि. नुसार उपलब्ध होणाऱ्या अनुज्ञेय बांधकाम क्षेत्रफळामधून मूळ सभासदांचे अस्तित्वातील बांधकाम क्षेत्र वगळून उर्वरित बांधकाम क्षेत्रफळ संस्थेस अधिमुल्याची आकारणी करुन वितरित करण्यात येते. संस्थेतील मूळ सभासदांना देय असलेले पुनर्वसन क्षेत्र एकूण बांधकाम क्षेत्रफळातून वजा करता उर्वरित बांधकाम क्षेत्र हे संस्था/विकासकांना खुल्या बाजारात विक्री करीता उपलब्ध असते.

शासनाने दिनांक २०/०८/२०१९ रोजी अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळाकरीता आकारण्यात येणाऱ्या अधिमूल्याच्या रकमेमध्ये ५०% सूट दिल्यामुळे म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाकरीता संस्था/विकासक पुढे येत असून, पुनर्विकासाकरीता म्हाडाच्या मुंबई मंडळाकडून परवानग्या देण्यात येत आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

गोरेगाव (मुंबई) येथील लक्ष्मीनगर एसआरए गृहनिर्माण संस्थेमधील झोपडीधारकांचे भाडे विकासकाने थकविल्याबाबत

(३७) * ६४८७ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (मुंबई) येथील लक्ष्मीनगर एसआरए गृहनिर्माण संस्थेमधील सुमारे ८५ झोपडीधारकांचे २ ते ३ वर्षाचे दिड कोटी रुपयांचे भाडे विकासक रिलायबल विकासक आणि डेव्हलपर्स यांनी थकविले असून सदर प्रकल्पाच्या कामास सन २०१३ मध्ये सुरुवात होवूनही अद्याप झोपडीधारकांना पुनर्विकसित इमारतीत घरे मिळाली नसल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासक सदानंद शेट्टी यांनी झोपडीधारकांना भाडे न देता एसआरए अधिकाऱ्यांना हाताशी धरुन ऑनलाईन सदनिकेची सोडत काढून झोपडीधारकांना सोडतीच्या नोटीसा देखील पाठविण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अपूर्णावस्थेत असलेल्या एसआरए इमारतीमध्ये सुरक्षेच्या दृष्टीने अग्निशमन यंत्रणा, वीज, पाणी, ड्रेनेजची सोय करण्यात आली नसूनही उपरोक्त इमारतींचे सोडत काढण्यात आल्यासंदर्भात शासनाकडे सातत्याने तक्रारी प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींविरुध्द कारवाई करुन झोपडीधारकांना भाडे अदा करुन पुनर्विकसित इमारतीमध्ये घरे मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड : (१) होय, हे खरे आहे.

विकासकाने झोपडीधारकांचे घरभाडे थकविले असल्या कारणाने प्रकल्पातील विक्री घटक इमारतीस काम थांबविण्याचे आदेश दिनांक १८/०२/२०२१ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच, पुनर्वसन योजना सन २०१३ रोजी सुरु होऊन पुनर्वसन इमारतीचे काम पूर्णत्वास येण्याच्या

दरम्यान मार्च, २०१९ मध्ये रहिवाशांनी विकासकास विकास आणि नियंत्रण प्रोत्साहन नियमावली, २०३४ नुसार पुनर्वसन सदनिकांचे क्षेत्रफळ २६९ चौ.फुटच्या ऐवजी ३०० चौ.फूट करण्याची विनंती केलेली आहे. त्यानुषंगाने सदर योजनेस दिनांक २३/०९/२०१९ रोजी सुधारित आशयपत्र प्रदान करण्यात आले असून पुनर्वसन इमारतीचे काम ३०० चौ.फुटा प्रमाणे अंतिम टप्प्यात आहे.

(२), (३) व (४) पुनर्वसन योजनेचे काम अंतिम टप्प्यात असल्याने विकासकाने झोपडपट्टीतील पात्र रहिवाशांना कायम स्वरुपी सदनिका वितरित करणेकरीता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या सहकार विभागातर्फे प्रचलित पध्दतीनुसार योजनेतील पात्र झोपडीधारकांची दिनांक २३/१२/२०२० रोजी सोडत काढली आहे.

अपूर्ण अवस्थेतील कामे जसे की, अग्निशमन यंत्रणा, वीज, ड्रेनेजची सोय व इतर फिनिशींगची कामे पूर्ण झाल्यानंतर व संबंधित विभागाचे काम पूर्णत्व प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर सदर पुनर्वसन इमारतीला झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे भोगवटा प्रमाणपत्र वितरित केले जाईल. तद्नंतर विकासक सदर इमारतीला कायमस्वरुपी पाणी नळ जोडणी महानगरपालिकेकडून घेईल व तद्नंतर सोडतीत यशस्वी झालेल्या झोपडीधारकांना त्यांच्या घराचा ताबा विकासकामार्फत दिला जाईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

दावडी व उंबार्ली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथे नियमबाह्यपणे भंगाराची दुकाने उभारण्यात आल्याबाबत

(३८) * ६८०५ श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दावडी व उंबार्ली (कल्याण-डोंबिवली महानगरपालिका) परिसरात मोठ्या प्रमाणात नियमबाह्य भंगाराची दुकाने उभारुन रस्त्याच्याकडेला अतिक्रमण करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नैसर्गिक टेकडीवर अतिक्रमण करून उभारण्यात आलेल्या भंगाराच्या दुकानांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) होय, हे खरे आहे.

(२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील दावडी व उंबार्ली या परिसरात नियमबाह्यपणे उभारण्यात आलेल्या भंगाराच्या दुकान मालकांवर मानपाडा पोलीस स्टेशन येथे दिनांक १७/१२/२०२० रोजी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

सदर भंगार दुकानांपैकी १० दुकाने व ८ पत्राशेड दिनांक २२/१२/२०२० रोजी निष्कासित करण्यात आलेली आहेत.

उर्वरित भंगार दुकानांचे मालक व जागा मालक यांना महाराष्ट्र महानगरपालिका कलम ४७८ अन्वये दिनांक २१/१२/२०२० रोजी नोटीस बजावण्यात आलेल्या असून पोलीस बंदोबस्त उपलब्धतेनुसार निष्कासनाची कार्यवाही प्रस्तावित आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे यांच्यावर विहित कायदेशीर प्रक्रियेव्दारे निष्कासनाची निरंतर कार्यवाही करण्यात येत असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी बनावट देयके अदा करून गैरव्यवहार केल्याबाबत

(३९) * ७०२८ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मंत्रांच्या बंगल्यासाठी मंजूर झालेली रुपये ९० कोटी रक्कम सन २००८ ते २०१५ या सालातील जुनी बनावट देयकांसाठी दिली असल्याची धक्कादायक बाब माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर देयकासंदर्भात तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी चौकशी करण्याचे आदेश देऊन चौकशी होईपर्यंत देयकांचे पैसे न देण्याचा निर्णय घेतला असतानाही संदर्भित ठेकेदारांनी बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करून सदर देयके अदा केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार गौरप्रकारे देयके अदा करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१) दिनांक १ जानेवारी, २०२१ रोजी वृत्त वाहिनी तसेच दिनांक २ जानेवारी, २०२१ रोजी वृत्तपत्रात या सदंर्भातील बातमी प्रसिध्द झाली असून त्यानुसार सदरची बाब अवगत झाली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सेवाग्राम-पवनार (जि.वर्धा) विकास आराखड्यांतर्गत करण्यात येणाऱ्या कामांबाबत

(४०) * ६९१८ श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यातील सेवाग्राम-पवनार विकास आराखड्यांतर्गत विकासाकरीता १० कोटींची तरतूद करूनही केवळ २१५० मीटर सिमेंट रस्त्याचे बांधकाम व १००० मीटर सिमेंट नाल्याचे बांधकाम पूर्ण झाले असल्याचे दिनांक १३ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विकास आराखड्यात हायमास्ट लाईटची उभारणी करूनही वीज जोडणी केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विकास आराखड्यात निधी मंजूर होवूनही इतर विकास कामे पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१) व (२) हे खरे नाही.

एकूण ९०७७ मीटर लांबीच्या सिमेंट काँक्रीट रस्त्यापैकी ७५५१ मीटर लांबीच्या सिमेंट काँक्रीट रस्त्याचे बांधकाम पूर्ण झाले आहे व एकूण ७६०५ मीटर सिमेंट काँक्रीट नालीच्या लांबीपैकी २५८५ मीटर सिमेंट काँक्रीट नालीचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

तसेच सदर विकास आराखड्यांतर्गत पवनार येथील आराखड्यात हायमास्ट लाईटची उभारणी करुन वीज जोडणी करण्यात आली आहे.

(३) वर्धा जिल्ह्यातील मागील २ वर्षापासून रेतीघाट लिलाव न झाल्यामुळे रेतीघाट बंद आहेत. रेतीच्या कमतरतेमुळे कामाची गती मंदावलेली आहे. तसेच कोविड-१९ या आजाराच्या प्रादुर्भावामुळे मजुरांची उपस्थिती व उपलब्धता अल्प प्रमाणात असल्यामुळे कामाची गती मंदावलेली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर महानगरपालिकेच्या अखत्यारितील सोसायटयांमधील कचऱ्यांची विल्हेवाट लावण्याबाबत

(४१) * ६७९४ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, श्री.निलय नाईक : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेच्या अखत्यारितील सोसायटयांमध्ये १०० किलो पेक्षा अधिकचा कचरा जमा होणार आहे त्या सोसायटयांना त्यांनी स्वत: कचऱ्यांची विल्हेवाट लावावी असे निर्देश दिले असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर महानगरपालिकेच्या संबंधित सोसायटयांनी ओला व सुका कचऱ्याचे विलगीकरण करावे अन्यथा सोसायटयांमधून कचरा उचलण्यात येणार नाही असे सांगण्यात आल्याने विविध सोसायटयांमधील नागरिकांनी तीव्र निषेध व्यक्त केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ मधील तरतुदीनुसार, १०० कि.ग्रा. पेक्षा अधिकचा कचरा निर्माण करणाऱ्या संस्था, सहकारी गृहनिर्माण संस्था व ज्यांचे क्षेत्रफळ ५००० वर्ग मिटर पेक्षा अधिक आहे, अशांनी स्वत: कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचे महापालिकेने निर्देश दिले आहेत.

(२) अशी कोणतीही तक्रार महापालिकेकडे प्राप्त झालेली नाही.

(३) लागू नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

परभणी महानगरपालिकेच्या जागेवरील व रस्त्यावरील अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत

(४२) * ६८७१ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरातील महानगरपालिकेच्या जागेवर तसेच रस्त्यांच्या दुतर्फा, शाळा, मार्केट आदी भागात करण्यात आलेले अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी आयुक्त महानगरपालिका, परभणी यांना आदेशित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयुक्त, परभणी महानगरपालिका यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे शहरातील अतिक्रमणे निष्कासित करणे, फुटपाथवरील रहदारीस अडथळा दुर करणे, हॉकर्स झोन निर्माण करणे, याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) परभणी शहरातील अतिक्रमणे निष्कासित करण्यासंदर्भात विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग यांनी आयुक्त, परभणी शहर महानगरपालिका यांना दूरध्वनीवरुन सूचना दिल्या होत्या, हे खरे आहे.

(२) व (३) परभणी शहरातील अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यासंदर्भात उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपिठ येथे सुओ मोटो रिट याचिका (क्र.९३४३/२०२०) दाखल करण्यात आली.

सदर रिट याचिकेमध्ये मा.न्यायालयाने अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यासाठी दिनांक ३१/०१/२०२१ पर्यंत स्थगिती दिलेली आहे. सदर न्यायालयाच्या आदेशामुळे दिनांक ३१/०१/२०२१ पर्यंत अतिक्रमणे हटविण्याची कार्यवाही झालेली नाही.

महानगरपालिकेने सर्वेक्षण करुन एकूण १३०५ अतिक्रमणांची यादी तयार केलेली आहे.

दिनांक १०/०२/२०२१ पासून सद्य:स्थितीत शहरातील २४० पेक्षा जास्त अतिक्रमणे निष्कासित केलेली असून, त्या ठिकाणी पुन्हा अतिक्रमणे होणार नाहीत याचीही दक्षता घेण्यात येत असून, उर्वरित अतिक्रमणे काढण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

शहरातील नागरीक व व्यावसायिक यांना राहती घरे व व्यावसायाच्या ठिकाणी नाल्यांवर बांधलेले ओटे, फरश्यांचे आवरण तसेच नालीच्या समोर उभारण्यात आलेली कच्च्या व पक्क्या स्वरुपाची अतिक्रमणे स्वत:हून काढून घेणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

परभणी शहरात हॉकर्स झोन तयार करण्यासाठी फेरीवाल्यांचे सर्वेक्षणाचे काम पूर्ण करण्यात आलेले असून फेरीवाला प्राथमिक झोन तयार करण्यात आले आहे. सदर कार्यवाही अंतिम करण्याची प्रक्रिया सुरु असल्याचे परभणी शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील शिव कोळीवाडा, भंडारवाडा गावठाणाकरीता मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगिती आदेशाचे पालन करणेबाबत

(४३) * ७०९९ श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.सुरेश धस, डॉ.परिणय फुके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शिव कोळीवाडा, भांडरवाडा गावठाणात समावेश होत असून मा.उच्च न्यायालयाच्या जनहित याचिका क्रमांक ५५/२०१९ अन्वये गावठाणातील घराना स्थगिती दिली आहे, हे खर आहे काय,

(२) असल्यास, शिव कोळीवाडा, भंडारावाडा गावठाण हे कोळीवाडा असून देखील उक्त ठिकाणी महानगरपालिकेमार्फत एसआरए प्रकल्प राबविण्यात येणार असून उक्त प्रकरणी महानगरपालिकेकडून नोटीस देखील देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिव कोळीवाडा, भंडारवाडा आगरदांडा गावठाणाची सीमांकन झालेले असताना देखील नागरिकांना नोटीस देऊन घरे खाली करण्याकरीता धमकाविण्यात येत असून शिव कोळीवाडा, भंडारवाडा गावठाण हे सन १९७३ मधील नकाशात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत दाखविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त ठिकाणी राबविण्यात येणाऱ्या एसआरए प्रकल्पास स्थगिती देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) हे अंशत: खरे आहे.

बॉम्बे ईस्ट इंडियन असोशिएशन यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र. ५५/२०१९ दाखल केली असून सदर जनहित याचिकेत मा.उच्च न्यायालयाने दिनांक २०/०८/२०१९ रोजी खालील अंतरिम आदेश दिले आहेत.

"Pending further orders there shall be an interim order in terms of prayer clause (f) in the petition."

सदर जनहित याचिकेत prayer clause (f) खालीलप्रमाणे आहे.

"That pending the hearing and final disposal of this Petition, this Hon'ble Court be please to grant a temporary injunction restraining Respondent No.३ M.C.G.M. from acquiring any Gaonthan land or houses or demolishing the same, without strict compliance with the due process of law."

सदर जनहित याचिका प्रकरणी सुनावणी होऊन मा.उच्च न्यायालयाचे अंतिम आदेश होणे बाकी आहे.

(२) सी.एस.क्र. ६(पै), शिवाजीनगर, सायन भंडारवाडा योजना क्र. ६ या महापालिकेच्या मालकीच्या भूभागावरील महानगरपालिका भाडेकरु व झोपडीधारकांनी स्थापन केलेल्या शिव कोळीवाडा सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) करीता विकास नियंत्रण नियमावलीच्या विनियम ३३(७) अन्वये

मंजूर योजनेचे लगतच्या ओंकार सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्यादित) येथील विनियम ३३(१०) अन्वये योजनेसोबत एकत्रित विकासाकरीता एकत्रिकरणाचे आशयपत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिनांक ३०/०५/२०१४ रोजी दिले आहे.

सदर प्रकल्पातील विकास कामामध्ये असहकार्य करणाऱ्या झोपडीधारकांविरोधात महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि. व पु) अधिनियम १९७१ चे कलम ३३/३८ अन्वये, सक्षम प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त एफ/उत्तर यांनी नोटीस देण्यात आल्या आहेत.

(३) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) अन्वये नगर विकास विभागाने दिनांक ८/०५/२०१८ रोजीच्या अधिसूचनेव्दारे बृहन्मुंबई क्षेत्राच्या विकास योजना २०३४ सह विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ ला मंजूरी दिलेली आहे. सदर अधिसूचनेसोबत प्रसिध्द झालेल्या धोरणात्मक टिप २७ नुसार ज्या ठिकाणी गावठाण/कोळीवाडा/ अदिवासी पाडा यांचे सीमांकन विकास नियोजन आराखड्यावर दर्शविण्यात आलेले नसेल त्या ठिकाणी गावठाण/कोळीवाडा/आदिवासी पाडे यांच्या महसूल विभागाने निश्चित केलेल्या हद्दी या विकास आराखड्यामध्ये गावठाण/ कोळीवाडा/आदिवासी पाडा यांच्या दर्शविलेल्या हद्दी म्हणून मानल्या जातील अशी तरतूद आहे.

तथापि, महसूल विभागाकडून अद्याप शिव कोळीवाडा, भंडारवाडा गावठाणाच्या सीमांकनाचा नकाशा प्राप्त होणे बाकी आहे.

मालमत्ता विभागाच्या अभिलेखाप्रमाणे सुधार विश्वस्त मंडळातर्फे मालमत्ता योजना क्र. ६ करीता सन १९०८ ते १९१२ दरम्यान जमीन संपादनाची कार्यवाही सुरु करण्यात आली व ती अंतिमत: सन १९३८ दरम्यान पूर्ण झाली. सदर भूभागाची मालकी महानगरपालिकेची आहे.

(४) चौकशीची बाब नाही.

राज्यातील संस्थांनी बनावट ऑनलाईन कर्मचारी पद भरती राबवून उमेदवारांची फसवणूक केल्याबाबत

(४४) * ६७२२ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.मोहनराव कदम, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई, पुणे सारख्या शहरामध्ये काही संस्था ऑनलाईन कर्मचारी पद भरती करीत असल्याचे तसेच या संस्थानी विदर्भातील अमरावती शहरामध्ये ही आपले जाळे पसरविले असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संस्थांव्दारे विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातही ऑनलाईन परीक्षा राबवून कर्मचाऱ्यांची विविध संस्थामध्ये पद भरती करण्यात आली असून या भरतीमध्ये सहकारी बँकामधील कर्मचारी, कृषी उत्पन्न बाजार समिती मधील कर्मचारी, कोतवाल पदाची भरती, शासनाच्या आदिवासी विभागातील विविध पदांसाठी कर्मचारी पद भरती अलिकडच्या काळात मोठ्या प्रमाणात राबविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पद भरती प्रकरणी संशय निर्माण झाला असून काही संस्थांची पद भरती प्रक्रिया बनावट निघाल्याने राज्यातील गरजवंत होतकरु तरुण/तरुणी उमेदवारांवर अन्याय झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उध्दव ठाकरे : (१) हे खरे नाही, महाआयटीकडून महापरीक्षा पोर्टलमार्फत विविध विभागाच्या गट ब (अराजपत्रित) व गट क च्या पदाच्या परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येत होत्या. तथापि, शासन निर्णय दिनांक २२/०२/२०२० च्या अन्वये सदर ऑनलाईन परीक्षापध्दत बंद करण्यात आलेली आहे.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजनेच्या जाचक अटी शिथिल करण्याबाबत

(४५) * ६७४७ श्री.विलास पोतनीस : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजनेची अंमलबजावणी दिनांक १ ऑगस्ट, २०१९ रोजीपासून करण्यात आली असून केवळ १०० ज्येष्ठ पत्रकारांच्या यादीनंतर अन्य ज्येष्ठ पत्रकार उक्त योजनेतील जाचक अटींमुळे लाभापासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार सदर योजनेच्या लाभासाठी राज्यातील ज्येष्ठ पत्रकार बंधू-भगिनींकडून ४० ते ५० वर्षापूर्वीची कात्रणे सादर करण्याची अट शिथिल करून अधिस्वीकृती पत्रिका, आधारकार्ड आणि स्वयंघोषणापत्र घेवून त्यांना सन्मानाने उपरोक्त योजनेचा लाभ मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उध्दव ठाकरे : (१) व (२) शासन निर्णय क्र. मावज-२०१३/प्र.क्र.१९५/ का-३४, दिनांक २ फेब्रुवारी, २०१९ नुसार आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना लागू करण्यात आली. असून या योजनेकरीता प्राप्त अर्जांची छाननी करुन याबाबतच्या समितीच्या बैठकीतील निर्णयानुसार माहे जुलै, २०१९ पासून आतापर्यंत १५९ ज्येष्ठ पत्रकारांना याचा लाभ देण्यात येत आहे. उर्वरित अर्जाबाबत त्रुटीची पूर्तता करण्याकरीता संबंधित ज्येष्ठ पत्रकारांना वेळोवेळी अवगत करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राष्ट्रीय महामार्गाच्या दुतर्फा झाडे लावण्याकडे दुर्लक्ष होत असल्याबाबत

(४६) * ७८५९ श्री.विनायकराव मेटे : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्गाचे बांधकाम करित असताना रस्त्याच्या दोन्ही बाजुला झाडे लावण्याची जबाबदारी प्राधिकरणाची तसेच संबंधित कंत्राटदाराची आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कणकवली ते झारापपर्यंत १७० शेतकऱ्यांनी शासनाच्या योजनेंतर्गत १ कि.मी. पर्यंतच्या खाजगी क्षेत्रात ५२६३१ वृक्षांची लागवड केली असून प्रथम वर्षासाठी १ कोटी ५१ लाख २६ हजार ८८५ रुपये अनुदान सामाजिक वनीकरणाने अदा केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या ३३ कोटी वृक्ष लागवड मोहिमेला माहे जुलै मध्ये वा त्यादरम्यान सुरुवात झाली असून सदर मोहिमेंतर्गत वाशिम जिल्ह्यात ५० लाख वृक्षांची लागवड करण्यात येणार होती मात्र वाशिम जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाच्या कामाकरीता १५ हजार वृक्षतोड करण्यात आल्यामुळे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने रस्ते तयार करताना कंत्राटदारांना वृक्ष लागवडीचे काम दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संस्कृती, वारसा, पर्यावरण, परंपरा आणि राष्ट्रीय जागृतीसाठी काम करणाऱ्या स्वंयसेवी संस्थेने याबाबत राष्ट्रीय लवादाकडे याचिका दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वृक्षतोड करण्याऱ्या दोषींवर कारवाई करुन राष्ट्रीय महामार्गावर वृक्ष लागवड करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच उक्त प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाने काय भूमिका घेतली वा घेण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

कणकवली ते झाराप, जि.सिंधुदुर्ग या लांबीमध्ये कणकवली व कुडाळ तालुक्यातील १७० शेतकऱ्यांनी महामार्गालगत १.०० कि.मी. पर्यंतच्या क्षेत्रात शासनाच्या वृक्ष लागवड योजनेंतर्गत ५२६३१ वृक्षांची लागवड केली आहे. त्याकरीता विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, सिंधुदुर्ग विभागातर्फे ज्या वैयक्तिक लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली आहे, अशा वैयक्तिक लाभार्थ्यांना रुपये १ कोटी १३ लाख २१ हजार ४९० इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे. उर्वरीत लाभार्थ्यांचे अनुदान त्यांचेकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर अदा करण्यात येणार आहे.

(३) अंशत: खरे आहे.

अकोला-वाशिम-हिंगोली-वारंगाफाटा NH-१६१ च्या चौपदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आले आहे.

सदर चौपदरीकरणाकरीता एकूण ४५३८ वृक्षतोड करण्यात आली असून वृक्ष लागवडीची बाब कंत्राटदाराच्या scope मध्ये आहे. सद्य:स्थितीत सदर रस्त्याचे बांधकाम प्रगतीपथावर असून अद्याप पूर्ण झालेले नाही. तरी रस्त्याचे बांधकाम पूर्ण होताच आयआरसी मानकानुसार कंत्राटदारामार्फत रस्त्याच्या दोन्ही बाजूस वृक्ष लागवड करण्यात येणार आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, वाशिम यांनी कळविले आहे.

(४) माहिती निरंक आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, वाशिम यांनी कळविले आहे.

(५) अ.क्र.३ च्या उत्तरामध्ये नमूद केल्यानुसार.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील कोविड सेंटरमध्ये कंत्राटी पध्दतीने नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यांना सेवेमधून कमी केल्याबाबत

(४७) * ६६८२ श्री.महादेव जानकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर आणि उपनगरात ठिकठिकाणी उभारण्यात आलेल्या कोविड सेंटरमध्ये मुंबई महापालिकेने एजन्सीव्दारे कंत्राटी पध्दतीने नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यांना कामावरुन कमी करुन सेंटर बंद करण्यात येत असल्याने कंत्राटी पध्दतीने नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यांचा रोजगार जावून सदर कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेतील रिक्त पदे भरतीच्या वेळी कोरोना काळात ज्या कंत्राटी, कर्मचारी, डॉक्टर, नर्सेस, वॉर्डबॉय यांनी काम केले त्यांना प्रथम प्रधान्य देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी अशी लोकप्रतिनिधींनी महानगरपालिका प्रशासनाकडे मागणी केली असल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) मुंबई शहर आणि उपनगरात कोविड बाधित संख्या कमी झाल्यामुळे वेळोवेळी आढावा घेऊन काही ठिकाणी कोविड सेंटर्स बंद करण्यात आली. त्यामुळे अशा ठिकाणी किंवा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये ज्याठिकाणी कामगारांची कमतरता भासत होती त्याठिकाणी एजन्सीव्दारे कंत्राटी पध्दतीने कामगार/कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली. त्यापैकी काही कंत्राटी कामगारांना कमी करण्यात आले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) मुंबई शहर आणि उपनगरात ठिकठिकाणी उभारण्यात आलेल्या कोविड सेंटरमध्ये उभारण्यात आलेल्या कोविड सेंटरमध्ये वैद्यकीय सेवा पुरविण्याकरीता डॉक्टर, नर्सेस, कामगार इ. संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या तात्पुरत्या स्वरुपात निव्वळ कंत्राटी तत्वावर एकावेळी तीन ते सहा महिन्यांकरीता अथवा कोविडचा प्रादुर्भाव कमी होईपर्यंत या अटी-शर्तींवर करण्यात आल्या.

तथापि, कंत्राट समाप्तीनंतर कामावरुन कमी करण्यात आलेल्या कंत्राटी तत्वावरील कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत सामावून घेण्याचे सध्या कोणतेही धोरण अस्तित्वात नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला महानगरपालिकेमध्ये राबविण्यात येणाऱ्या भूमिगत गटार योजनेबाबत

(४८) * ६८०३ श्री.गोपिकिशन बाजोरीया : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ९ मधील प्रश्न क्रमांक ५८०२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेमध्ये भूमिगत गटार योजना पूर्णपणे गैरकायदेशिररित्या राबविण्यात येत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यामुळे सन २०१८ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये मा.मंत्री यांनी सदर कामाला स्थगिती दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रश्नांच्या चर्चेदरम्यान मा.मंत्री महोदयांनी संबंधित विभागाला व महानगरपालिका प्रशासनाला जे निर्देश दिले होते त्याची पूर्णपणे पायमल्ली करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत प्रश्न उपस्थित करणाऱ्या लोकप्रतिनिधींना कोणत्याही बैठकीला निमंत्रित न करता व विश्वासात न घेता एकतर्फी स्थगिती उठवण्यात आली असून याबाबतची माहिती संबंधित लोकप्रतिनिधींना आजपावेतो देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्थगिती असतानासुध्दा अकोला महानगरपालिका प्रशासनामार्फत शासनाच्या आदेशाची पालमल्ली करून भूमिगत गटारीचे काम सुरू असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त योजनेमध्ये रेल्वे प्रशासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेले नसतानासुध्दा शासनाची दिशाभूल करून फक्त कंत्राटदारांना व काही विशेष व्यक्तींना लाभ होण्याकरीता या योजनेवर कोट्यवधीचा खर्च झाले असल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबत शासनाची भूमिका काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) अकोला महानगरपालिकेच्या भूयारी गटार योजनेच्या कामाची संयुक्त पाहणी मा.विधानपरिषद सदस्य व विभागाचे इतर अधिकारी यांनी करण्याचे आदेश देऊन संबंधित अधिकाऱ्यांनी आपला अहवाल सादर करावा, तोपर्यंत या कामाला स्थगिती देण्यात येत असल्याचे तत्कालीन मा.राज्यमंत्री (पर्यावरण) यांनी दिनांक १७/०७/२०१८ रोजी सभागृहात घोषित केले होते.

त्यानुसार, अकोला महानगरपालिकेच्या भूयारी गटार योजनेच्या कामाची तपासणी करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व पाटबंधारे विभागातील अधिकारी तसेच विशेष आमंत्रित सदस्य यांची समिती पर्यावरण विभागाने त्यांच्या दिनांक २९/०८/२०१८ रोजीच्या आदेशान्वये नेमली होती.

सदर समितीने मा.विधानपरिषद सदस्य यांच्यासह दिनांक ३१/०८/२०१८ रोजी अकोला महानगरपालिकेच्या भूयारी गटार योजनेच्या कामाची पाहणी केली. त्यावेळी अकोला येथे झालेल्या बैठकीत मा.विधानपरिषद सदस्य यांना निमंत्रित केले होते. सदर समितीने त्यांचा अहवाल पर्यावरण विभागास दिनांक ०५/०९/२०१८ रोजी सादर केला होता.

या अहवालावर चर्चा करण्यासाठी सदर समितीच्या सदस्यांची बैठक तत्कालीन प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांच्याकडे दिनांक १६/१०/२०१८ रोजी आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार अकोला महानगरपालिकेच्या भूयारी गटार योजनेच्या कामास देण्यात आलेली स्थगिती उठविण्याबाबतच्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिली होती. त्यानुसार सदर स्थगिती आदेश उठविण्यात आल्याचा निर्णय पर्यावरण

विभागाने आयुक्त, अकोला महानगरपालिका यांना दिनांक १३/११/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळवला होता.

(४) हे खरे नाही.

पर्यावरण विभाग त्यांच्या दिनांक १३/११/२०१८ रोजीच्या पत्रान्वये उक्त स्थगिती उठविल्याचे कळविल्यानंतर सदर प्रकल्पाचे काम सुरु करण्यात आले आहे.

(५) व (६) अकोला महानगरपालिकेमार्फत रेल्वे क्रॉसिंग अंतर्गत कामाबाबत रेल्वे प्रशासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला होता, तद्नंतर रेल्वे प्रशासनाकडून परवानगी प्राप्त झाल्यानंतर रेल्वे क्रॉसिंगच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे.

राज्यात धर्मादाय रुग्णालयामार्फत जनहिताच्या बाबींचे उल्लंघन होत असल्याबाबत

(४९) * ७४४२ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सदाशिव खोत : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात धर्मादाय रुग्णालयामार्फत एकूण क्षमतेच्या १० टक्के बेडस् मोफत देणे तसेच १० टक्के बेडसना ५० टक्के सवलतीमध्ये उपचार करणे (गोरगरीब रुग्णांना) आवश्यक असताना धर्मादाय रुग्णालये राजरोसपणे सदर जनहिताच्या बाबींचे उल्लंघन करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोरगरीब रुग्णांना न्याय मिळण्यासाठी सर्व धर्मादाय रुग्णांलयातील रुग्णसुविधेचे लेखा परीक्षण करणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उध्दव ठाकरे : (१) हे खरे नाही.

राज्यातील धर्मादाय रुग्णालये महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ४१ कक अंतर्गत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी आदेशित केलेल्या योजनेचे अनुपालन सर्वसाधारणपणे करतात. तथापि, काही धर्मादाय रुग्णालयांकडून मा.उच्च न्यायालयीन योजनेचे पालन होत नसल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास जिल्हास्तरीय कार्यालयाकडून व देखरेख समितीकडून आवश्यक चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करण्यात येते.

(२) नाही.

यासंदर्भात नमूद करण्यात येते की, धर्मादाय रुग्णालयातील रुग्णसुविधेची तपासणी करण्याकरीता शासनाच्या विविध विभागांकडून पुढीलप्रमाणे समित्या गठीत करण्यात आल्या आहेत : १) धर्मादाय सह आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली तपासणी समिती, २) अपर मुख्य सचिव, आरोग्य विभाग यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समिती, ३) जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समिती, ४) तज्ञ डॉक्टरांची समिती, ५) धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी करण्याकरीता महाराष्ट्र विधानमंडळाची तदर्थ संयुक्त समिती.

सबब, वरील समित्यांनुसार धर्मादाय रुग्णालयातील रुग्णसुविधेंची वेळोवळी तपासणी करुन आवश्यक कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील गिरणी कामगारांना सदनिका वाटप करण्याबाबत

(५०) * ७९२७ श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अमोल मिटकरी, श्री.संजय दौंड, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अभिजित वंजारी : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बंद पडलेल्या गिरण्यांच्या जागा विकसित करुन तेथे विकासकांमार्फत गिरणी कामगारांसाठी सदनिका बांधण्याबाबत शासनाने अनेक वर्षापूर्वी धोरण निश्चित केले असून घरे मिळण्याकरीता सुमारे १,७५,००० हजार गिरणी कामगारांनी नोंदणी केलेली असून त्यापैकी दिनांक २८ जून, २०१२ रोजी ६९२५, दिनांक ९ मे, २०१६ रोजी २६३४ आणि दिनांक २ डिसेंबर, २०१६ रोजी २४१७ अशाप्रकारे आजवर सुमारे केवळ ११,९७६ घरांचे गिरणी कामगारांना वाटप झालेले असून उर्वरित नोंदणी केलेले गिरणी कामगार गत अनेक वर्षांपासून घरांच्या प्रतिक्षेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९८२ मध्ये अनेक गिरणी कामगारांकडे त्यासंदर्भातील कागदपत्रे अपूर्ण असल्यामुळे त्यांना सदनिका वाटप यादीनुसार सदनिका वाटप करण्यात आले नसल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या-ज्या गिरणी कामगारांना अपूर्ण कागदपत्राअभावी सदनिका देण्यात आलेल्या नाहीत त्या गिरणी कामगारांनी मागाहून परिपूर्ण माहिती सादर केली असतानाही त्यांना सदनिका देण्यात आल्या नसल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदनिका वाटप न केलेल्या संबंधित गिरणी कामगारांना सदनिका वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड : (१) अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील ५८ बंद/आजारी गिरण्यांच्या जागांपैकी म्हाडाकडे ताबा प्राप्त झालेल्या गिरण्यांच्या जागांवर बांधकाम पूर्ण झालेल्या २८ गिरण्यांच्या जागेवरील एकूण १३४५३ सदनिकांची व एमएमआरडीएकडून प्राप्त झालेल्या २४१७ सदनिका अशा एकूण १५९७० सदनिकांची म्हाडामार्फत सोडत काढण्यात आलेली आहे.

(२) सोडतीमधील यशस्वी अर्जदारांना पात्रता निश्चितीसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे. पात्रता निश्चिती प्रलंबित असलेली बहुतांश प्रकरणे ही वारस प्रमाणपत्र, पंजीकृत हक्कसोड सादर न करणाऱ्या अर्जदारांची आहेत. तसेच अपात्र ठरलेल्या अर्जदारांच्या सदनिका वितरणासाठी वेळोवेळी प्रतिक्षा यादी कार्यान्वित करण्यात येते.

(३), (४) व (५) दिनांक २८ जून, २०१२ रोजी झालेल्या ६९२५ सदनिकांच्या सोडतीमधील ६५९१ सदनिकांचा ताबा देण्यात आलेला आहे. तसेच या सोडतीमधील स्वान मिल, कुर्ला व शिवडी येथील २१८ अर्जदारांचे प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. उर्वरीत सदनिकांचे वाटप करण्यासाठी प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांना संधी देण्याचे काम सुरु आहे. दिनांक ९ मे, २०१६ रोजी २६३४ सदनिकांच्या सोडतीमधील २२२८ सदनिकांचा ताबा देण्यात आलेला आहे. दिनांक २ डिसेंबर, २०१६ रोजी झालेल्या सोडतीमधील सदनिका एमएमआरडीएकडून कोविड-१९ च्या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने विलगीकरणासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेकडे दिलेल्या असल्याने सदनिका वितरणाचे काम प्रलंबित आहे.

जिंतूर ते देवगांव फाटा (ता.जिंतूर, जि.परभणी) राष्ट्रीय महामार्गाच्या कामाबाबत

(५१) * ७१५१ श्री.विप्लव बाजोरिया : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिंतूर ते देवगांव फाटा (ता.जिंतूर, जि.परभणी) या रस्त्यासाठी राष्ट्रीय महामार्ग विभाग जालना कार्यालयाने १४ कोटी रूपये मंजूर केले असून सदर निधीतून १६ कि.मी. चे काम करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यामध्ये मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून कंत्राटदाराने पिंपरी ते साहील ढाबापर्यंत ३ ते ४ कि.मी. रस्त्याचे काम केले असून मात्र गत १ महिन्यापासून काम थांबले असल्यामुळे रस्त्यावर साईड पट्ट्याचे खोदकाम करून ठेवल्याने रात्रीच्यावेळी वाहनधारकांना रस्त्याचा अंदाज येत नसल्याने अपघाताच्या प्रमाणात वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याचे काम करणाऱ्या कंत्राटदाराने सुरक्षेच्या उपाययोजना केल्या नसल्यामुळे रात्रीच्या वेळी घडणाऱ्या अपघातांस जबाबदार असणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग विभाग, जालना कार्यालयाच्या संबंधित अधिकारी व कंत्राटदारावर कारवाई करुन सदर रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद शहराला समांतर जलवाहिनीच्या माध्यमातून पाणीपुरवठा करण्याबाबत

(५२) * ७७७३ श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील शहरवासीयांना समांतर जलवाहिनीच्या माध्यमातून २४ तास पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन महानगरपालिकेने दिलेले असताना तसेच सदर योजनेसाठी केंद्र शासनाकडून निधीही उपलब्ध असताना १६८० कोटी रुपयांची योजना अद्यापही वरिष्ठ पातळीवर मंजुरीच्या प्रतिक्षेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जायकवाडी धरण पूर्णत: भरलेले असताना केवळ यंत्रणा सक्षम नसल्यामुळे औरंगाबाद शहरवासीयांना आठवड्यातून एकदा पाणी मिळत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नवीन पाणीपुरवठा योजनेला अद्यापही मंजुरी न मिळण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त योजनेस विनाविलंब मंजुरी देवून कार्यान्वित होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत रुपये १६८०.५० कोटी किंमतीच्या औरंगाबाद शहर पाणीपुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

सदर प्रकल्पाची कार्यान्वयीन यंत्रणा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ही असून यांच्यामार्फत दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२१ रोजी प्रकल्पाचे कार्यादेश देण्यात आले आहेत.

(२) हे अंशतः खरे आहे.

औरंगाबाद शहराची प्रत्यक्ष मागणी आणि उपलब्धता यातील तफावत, जलकुंभाची कमी पडत असलेली साठवण क्षमता, जुन्या जलवाहिन्या या कारणांमुळे शहरास सद्य:स्थितीस चार दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

नवीन पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण झाल्यानंतर औरंगाबाद शहराला नियमित पाणीपुरवठा करण्याचे औरंगाबाद महानगरपालिकेचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) व (५) सदर प्रकल्पाचे कार्यादेश दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२१ रोजी देण्यात आले आहेत.

योजनेच्या प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आली आहे.

राज्यातील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांनी प्रलंबित मागण्यांसाठी राज्यव्यापी आंदोलन करण्याचा इशारा दिल्याबाबत

(५३) * ६८३६ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्याच्या प्रलंबित मागण्यसाठी राज्यव्यापी आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय गट-ड (चतुर्थश्रेणी) कर्मचाऱ्याच्या मागण्यांचे निवेदन मा.मुख्यमंत्री आणि मा.उप मुख्यमंत्री महोदयांना देवूनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिपाई, रात्र पहारेकरी, नाईक, सफाई कामगार, कामाठी, हमाल, तेलवाला, परिचर प्रयोगशाळा सहाय्यक इत्यादी विभागातील आणि शासकीय अनुदानित शाळांमधील कर्मचारी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यावर सदर पदे रद्द न करता इतर कर्मचाऱ्यांना सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उध्दव ठाकरे : (१) होय, हे खरे आहे.
(२) राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, महाराष्ट्र यांच्या दिनांक ३०/१२/२०२० रोजीच्या निवदेनानुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदय यांची बैठकीसाठी वेळ व दिनांक देण्याबाबत मा.मुख्यमंत्री मुलाखत कक्ष यांच्याकडे विनंती करण्यात आली.
(३) उक्त प्रकरणी दिनांक ३०/१२/२०२१ रोजीच्या निवेदनातील मागण्याच्या अनुषंगाने संबंधित विभागांना दिनांक १२/०१/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले असून, प्रस्तावित बैठकीसाठी वस्तुस्थितीदर्शक अहवाल मागविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे विद्यमान नगररचनाकार यांचेवर कारवाई करण्याबाबत

(५४) * ६४२८ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे विद्यमान नगररचनाकार श्री.राजेश मोरे यांनी पत्नीच्या नावे असलेल्या "मोरे डेव्हलपर्स" ह्या सात मजली अनधिकृत इमारतीचे बांधकाम केल्याप्रकरणी त्यांना बडतर्फ करण्यात आलेले असतानाही गत अनेक वर्षापासून ते विनावेतन महापालिकेत काम करीत असून त्यांना उप अभियंता पदाचा दर्जा देवुन डोंबिवली विभागात नगररचनाकार या पदावर कार्यरत ठेवण्यात आल्यामुळे उक्त प्रकरणाची सखोल चौकशी करण्याबाबत सामाजिक कार्यकर्ते श्री.मनोज कुलकर्णी यांनी आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांच्याकडे दिनांक २२ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार करुनही कोणतीच कारवाई झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सात मजली इमारतीच्या क्रमांक २९२ भूखंडावर जिमनॅशियमचे आरक्षण असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे तसेच सदर आरक्षण असलेल्या भूखंडावर बांधण्यात आलेल्या इमारतीमधून १८ मीटरचा रस्ता सुध्दा बाधित होत असून सदर इमारतीवर टी.डी.आर. न चढवताच वरील तीन मजले कोणतीही पूर्वमंजुरी न घेता अनधिकृतपणे बांधण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर अनधिकृत बांधकामाचे निष्कासन करुन "मोरे डेव्हलपर्स" या कंपनीच्या मालकावर एम.आर.टी.पी. अन्वये गुन्हा दाखल करून विनाविलंब निलंबन करून विभागीय चौकशी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) सदर विषयासंदर्भात सामाजिक कार्यकर्ता श्री.मनोज कुलकर्णी यांची कल्याण-डोंबिवली महानगरपालिका प्रशासनास दिनांक २२/१२/२०२० रोजी तक्रार प्राप्त झाली आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने सहायक संचालक नगररचना यांचेकडून महानगरपालिका प्रशासनास अहवाल प्राप्त झालेला असून, पुढील आवश्यक ती कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरू आहे.

श्री.राजेश मोरे यांना यापुर्वी अनधिकृत बांधकामाच्या कारणास्तव सेवेतून बडतर्फ करण्यात आले, अशी वस्तुस्थिती नाही.

(२) व (३) समावेशक आरक्षणाच्या धर्तीवर आरक्षण क्र.२९२ व्यायामशाळा या आरक्षणाकरीता सन २००३ मध्ये बांधकाम परवानगी देण्यात आलेली असून, सन २०१३ मध्ये सुधारित बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.

त्यामध्ये इमारत क्र. १ (तळ +४ मजले) रहिवाश्यासाठी, इमारत क्र. २ मधील पहिल्या भागात (तळ + ५ मजले) रहिवाश्यासाठी, दुसऱ्या भागात (तळ + ३ मजले) व्यायामशाळेसाठी तर इमारत क्र. ३ (तळ + ५ मजले, ६ वा व ७ वा मजला भागश:) रहिवास/वाणिज्यसाठी परवानगी देण्यात आलेली आहे.

सदर आरक्षण असलेल्या भूखंडावर बांधण्यात आलेल्या इमारतीमधून १८ मीटरचा रस्ता बाधित होत नाही.

आरक्षण क्र. २९२ मधील इमारत क्र. ३ च्या ६ व्या व ७ व्या मजल्यावर मंजूरीपेक्षा अधिकचे बांधकाम केल्याचे निदर्शनास आले असून, त्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ व ५३ अन्वये कारवाई करण्यात येत असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मीरा-भाईंदर महानगरपालिका (जि.ठाणे) येथे दैनंदिन वापरासाठीच्या वस्तू वाढीव दराने खरेदी केल्याबाबत

(५५) * ६८७९ श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा-भाईंदर महानगरपालिका (जि.ठाणे) येथे कोरोना काळात अलगीकरण व विलगीकरण कक्षातील लोकांच्या दैनंदिन वापरासाठीच्या वस्तू छापील किंमतीपेक्षा जास्त दराने खरेदी केल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे मे-जुलै या कालावधीत १ कोटी ५९ लक्ष रुपयांची देयके देण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दैनंदिन वापरासाठीच्या वस्तू छापील किंमतीपेक्षा जास्त दराने खरेदी करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१), (२) व (३) कोविड-१९ साथरोगावर नियंत्रण आणण्याकरीता संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये दिनांक २१ मार्च, २०२० पासून लॉकडाऊन करण्यात आला होता.

सदर लॉकडाऊनमध्ये अत्यावश्यक सेवा वगळता उर्वरित दुकाने व वाहतुकीची साधने संपूर्णत: बंद होती.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता कोविड रूग्णालय तसेच अलगीकरण केंद्रे उभारण्यात आली होती.

सक्षम प्राधिकारी म्हणून आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी सदर अलगीकरण केंद्रात येणारे संशयित रूग्ण व बाधित रूग्ण यांना दैनंदिन वस्तुचा पुरवठा करण्याकरीता वस्तुंचे दर मागवून अत्यावश्यक वस्तुंचा पुरवठा करण्याचे मे.एम.एस. इंटरप्राइजेस यांना आदेश दिले.

लॉकडाऊनमुळे फक्त जीवनाश्यक वस्तुंची दुकाने उघडी होती. इतर वस्तू बाजारामध्ये सहज उपलब्ध होत नसल्याने छापील किंमतीपेक्षा जास्त दर द्यावा लागला, ही वस्तुस्थिती आहे.

पुरविण्यात आलेल्या दैनंदिन वापराच्या वस्तुंचे देयक संबंधित पुरवठादारास अदा केले आहे.

लॉकडाऊनमध्ये शिथिलता मिळाल्यानंतर निविदा प्रक्रिया राबवून न्यूनतम निविदाकार श्री.गणेश इंटरप्राइजेस यांना वस्तू पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले. पुर्वीपेक्षा सदर दर कमी असल्याचे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या जलाशयांमार्फत अशुध्द पाणीपुरवठा होत असल्याबाबत

(५६) * ७०३७ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत २७ जलाशयांमार्फत शहरात आणि उपनगरात पाण्याचे वितरण केले जाते, मात्र पाणी वितरित होताना जेथे जलवाहिन्या गळक्या व फुटल्या आहेत तेथून अशुध्द पाणी या जलवाहिन्यांमध्ये शिरत असल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गळक्या जलवाहिन्यांमुळे झोपड्या, चाळी व इमारती अशा बहुतांश वस्त्यांमध्ये अशुध्द पाण्याचा पुरवठा होत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईच्या पाणी वितरण व्यवस्थेमधील गळतीचे प्रमाण २५ ते ४० टक्के असून ८६२ ते १३०० दशलक्ष लिटर पाणी गळतीमुळे वाया जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मुंबईतील पाणी वितरण व्यवस्थेमधील गळतीचे प्रमाण रोखून मुंबईत शुध्द पाणीपुरवठा करण्याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) व (२) मुंबईला तीन महासंतूलन जलाशय व २७ सेवा जलाशयाच्या माध्यमातून पाणीपुरवठा करण्यात येतो.

सदर जलवाहिन्या जुन्या व जीर्ण झाल्यास, रस्ते, पूल व मेट्रो यांसारख्या पायाभूत सुविधांची कामे सुरु असताना त्यास हानी पोहोचल्यास त्यातून गळती होते. तसेच कार्यान्वित नसताना गळतीच्या ठिकाणातून त्यामध्ये अशुध्द/ सांडपाणी आत गेल्यास त्या जलवाहिनीव्दारे होणाऱ्या पाणी पुरवठ्यामुळे काही ठिकाणी/ ठराविक भागात अशुध्द पाणीपुरवठा होण्याची शक्यता नाकारता येत नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील जलवाहिनींची व जलजोडण्यांची लांबी व संख्या लक्षात घेता, मुंबईतील गळतीचे अचूक प्रमाण ठरविणे कठीण असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) मुंबईतील पाणी वितरण व्यवस्थेमधील गळतीचे प्रमाण रोखून मुंबईत शुध्द पाणीपुरवठा करण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत :-

- जुन्या व जीर्ण झालेल्या जलवाहिन्या बदलून त्याठिकाणी नवीन जलवाहिनी टाकणे - मागील तीन वर्षांत सुमारे ५०.७६ कि.मी. लांबीच्या जलवाहिन्या बदलून त्याठिकाणी नवीन जलवाहिन्या टाकण्यात आल्या आहेत.
- सेवा जलजोडण्यांचे नुतनीकरण करणे - मागील तीन वर्षांत सुमारे ५१,५२३ जलजोडण्यांचे नुतनीकरण करण्यात आले आहे.
- सेवा जलजोडण्यांच्या जुडग्यांऐवजी एक सामाईक जलवाहिनी टाकणे - सुमारे ३०५ ठिकाणी जलजोडण्यांचे जुडगे काढून सामाईक जलवाहिनी तसेच स्टब मेन्स टाकण्यात आल्या आहेत.
- गळतीची ठिकाणे शोधून त्यांची दुरुस्ती करणे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

किनवट (जि.नांदेड) शहरामध्ये नगरपालिका प्रशासनाच्या जागेवर अतिक्रमण झाल्याबाबत

(५७) * ६७२४ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.मोहनराव कदम, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट (जि.नांदेड) शहरामध्ये अनेक ठिकाणी नगरपालिका प्रशासनाच्या जागांवर अतिक्रमण धारकांनी अतिक्रमण केल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किनवट नगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे अनेक ठिकाणी नगरपालिकेच्या मालकीच्या जागेत अतिक्रमण करु नये अन्यथा दंडात्मक कारवाई करण्यात येईल असे फलक लावले असतानाही अतिक्रमण करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने किनवट नगरपालिकेच्या मालकीच्या जागांवर अतिक्रमण करणाऱ्यांविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) व (२) अंशतः खरे आहे.

किनवट नगरपरिषदेच्या मालकीच्या जागांवर अतिक्रमण करुन जागा गिळंकृत केल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये आढळले नसले तरी, नगरपरिषदेच्या जागांवर अतिक्रमणे असल्याच्या तक्रारी प्राप्त असल्यामुळे सर्वेक्षणाचे काम सुरु केल्याबाबत जिल्हाधिकारी, नांदेड यांनी अहवाल सादर केला आहे.

(३) अतिक्रमण आढळल्यास नगरपरिषद स्तरावर ते हटविण्याची कार्यवाही केली जात असल्याबाबत जिल्हाधिकारी, नांदेड यांनी अहवाल सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील गावठाणांचे रेखांकन करण्यात आल्याबाबत

(५८) * **६७६४ श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या सन २०३४ च्या विकास आराखड्यात गावठाण आणि स्वतंत्र मालमत्ता ह्याबाबत संभ्रम निर्माण झाला असल्यामुळे मुंबईतील १८९ गावाठाणांपैकी केवळ ५२ गावठाणांचे रेखांकन करण्यात आले असून इतर गावठाणांना विकास आराखड्यातून वगळण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगर विकास विभागाने नेमलेल्या दिनेश अफझलपूरकर समितीच्या अहवालात मुंबईत १८९ गावठाणे असल्याची नोंद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१२ मध्ये शासनाने गावठाणातील मालमत्तेचे स्वतंत्र संरक्षण करण्यासाठी समिती नेमण्याचा निर्णय घेवून आठ वर्षे उलटूनही सदर समिती नेमण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईच्या २०३४ च्या विकास आराखड्यात उर्वरित १३७ गावठाणांचे रेखांकन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) हे खरे नाही.

मुंबई उपनगर जिल्ह्यात नगर भूमापन अभिलेखाप्रमाणे एकूण ८५ महसूली गावे असून त्यापैकी ५५ गावांना गावठाण आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रारुप विकास योजना-२०३४ सह विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ ला शासनाने दिनांक ८/०५/२०१८ च्या अधिसूचनेव्दारे मंजुरी दिली असून सदर अधिसूचनेतील स्पष्टीकरणात्मक टिप्पणी क्र. २७ तसेच विनियम ३३(१६) चे उपखंड (सी) नुसार महसूल विभागामार्फत निश्चित करण्यात येणाऱ्या गावठाण/कोळीवाडा/ आदिवासी पाडा यांचे सीमांकन/हद्दी या विकास योजनेतील सीमांकन/हद्दी समजण्यात येतील अशी तरतूद आहे.

त्यानुसार महसूल विभागाने मुंबई उपनगरातील गावठाण/कोळीवाडा/ आदिवासी पाडा यांचे सीमांकन करून बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे पाठविलेल्या गावठाण/कोळीवाडे/आदिवासी पाडा संबंधी विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील विनियम ३३(१६)(सी) नुसार विकास योजनेत सीमांकन दर्शविण्याबाबत महानगरपालिका स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(२) हे खरे नाही.

मुंबई व उपनगरातील मोडकळीस आलेल्या इमारतींची पुनर्बांधणी याविषयी समस्यांचा अभ्यास करुन उपाययोजना सुचविण्यासाठी शासनाचे गृहनिर्माण विभागाने दिनांक १७/०३/१९९८ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे श्री.दिनेश अफझुलपूरकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली होती. सदर समितीने शासनास सादर केलेल्या समितीच्या अहवालातील प्रकरण क्र.१७ गावठाणांचा पुनर्विकास याविषयी आहे. तथापि, सदर अहवालात देखील मुंबईत १८९ गांवठाणे असल्याची नोंद नाही.

(३) अशी बाब नाही.

तथापि, कोळीवाड्यांच्या सीमांची गावठाणाप्रमाणे भूमि अभिलेख दफ्तरी नोंद नसल्याकारणाने शासन महसूल विभागाने दिनांक १९/११/२०१२ रोजीचे शासन निर्णयाव्दारे मुंबईतील कोळीवाड्यांच्या सीमांकनाबाबत कार्यपध्दती निश्चित करण्यासाठी समिती गठीत केली असून सदर समिती कार्यरत आहे.

(४) उपप्रश्न क्र. १ चे उत्तरात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई सेंट्रल येथील सिटी सेंटर मॉलच्या दुसऱ्या मजल्यावर आग लागल्याबाबत

(५९) * ६७०८ श्री.महादेव जानकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई सेंट्रल येथील तीन मजली सिटी सेंटर मॉलच्या दुसऱ्या मजल्यावर आग लागून अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यासह पाच जवान गंभीररित्या जखमी होवून कोटयवधी रूपयाच्या मालमत्तेचे नुकसान झाले असल्याचे दिनांक २३ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आग विझविण्यासाठी अग्निशमन दलाची संपूर्ण यंत्रणा कामाला लागून २४ फायर इंजिन, १७ जंबो टंक, ५० वाहने, २५० जवानांच्या उल्लेखनीय कामगिरीमुळे ४० तासाच्या अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणण्यास यश आले असून उक्त आगीमुळे मॉलच्या बाजूच्या इमारतीमधील ३५०० रहिवाशांना सुरक्षितपणे मोकळया मैदानात स्थलांतरीत करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई मधील मॉल, दुकाने किंवा इतर इमारतीमधील आगी लागण्याचे वाढते प्रमाण लक्षात घेवून अग्निसुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या सर्व मॉलना अग्निशमन दलाकडून नोटीसा बजावण्यात आल्या असून सदर नोटीसाच्या अनुषंगाने किती मॉलची तपासणी करण्यात आली आहे तसेच, नियमाचे उल्लंघन करणाऱ्या किती मॉलविरुध्द कारवाई करण्यात आली वा येत आहे, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) हे खरे आहे.

सदर आग विझवितांना अग्निशमन दलाचे १६ अधिकारी/कर्मचारी यांना दुखापत झाली होती. तथापि, त्यांच्यावर नायर व जे.जे. रुग्णालयामध्ये उपचार करुन त्यांना घरी सोडण्यात आले.

(२) सदर मॉलमधील विविध जळाऊ पदार्थांमुळे मोठ्या प्रमाणावर निघत असलेला धूर लगत असलेल्या ऑर्किड एन्क्लेव्ह या उत्तुंग रहिवाशी इमारतीत पसरत होता.

या धुरामुळे कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये म्हणून सदर इमारतीतील सर्व रहिवाशांना आग विझेपर्यंत तात्पुरत्या कालावधीकरीता मोकळ्या मैदानात स्थलांतरीत करण्यात आले होते.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अंतर्गत मुंबईतील ७० मॉल्सची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी अग्निसुरक्षिततेच्या दृष्टीने त्रुटी आढळून आलेल्या ३० मॉल्सना महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील कलम ६ अंतर्गत नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

नोटीस बजावण्यात आलेल्या ३० मॉल्सपैकी १४ मॉल्सनी अग्निसुरक्षेच्या दृष्टीने देण्यात आलेल्या नोटीसची पूर्तता केली असून, उर्वरित १६ मॉल्सना अग्निसुरक्षा उपाययोजना पूर्ण करण्याकरीता कालमर्यादा वाढवून देण्यात आल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला महानगरपालिकेतील वाढीव पाणीपुरवठा योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

(६०) * ६८०८ श्री.गोपिकिशन बाजोरीया : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीमध्ये पाणीपुरवठा करण्याकरीता अमृत योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणात पाईप लाईन टाकण्याचे काम सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला शहरातील न्यु तापडीया नगर भागासाठी ३०० व्यासाची पाईप लाईन टाकण्याचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व महानगरपालिका अधिकाऱ्यांच्या समन्वयाअभावी निकृष्ट दर्जाचे होत असल्याची तक्रार स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींनी महानगरपालिका प्रशासन व शासनाकडे माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त कामाकरीता मध्य रेल्वे व दक्षिण रेल्वे प्रशासनाची परवानगी मिळणे आवश्यक असून रेल्वे लाईन क्रॉस करण्यासाठी रेल्वे विभागाची परवानगी मिळाली नसूनही अकोला महानगरपालिकेने उक्त योजनेवर आतापर्यंत ५५ लक्ष रूपये खर्च केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने परवानगी शिवाय पाईप लाईनचे काम सुरू करुन जनतेच्या पैशाची उधळपट्टी करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत अकोला शहर पाणीपुरवठा प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.

सदर प्रकल्पाच्या पाईप लाईन टाकण्याचे काम सद्य:स्थितीस शहराच्या मूळ हद्दीत मंजूर सविस्तर प्रकल्प अहवालानुसार काम सुरु आहे.

(२) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत अकोला शहराच्या हद्दीमध्ये महाजनी जलकुंभ झोनमध्ये ३५० मी.मी. व्यासाची वितरण व्यवस्थेतील मुख्य जलवाहिनी शहराच्या वाढीव भागात पाणीपुरवठा करण्याच्या उद्देशाने टाकण्यात आलेली आहे.

मुख्य जलवाहिनी टाकताना अकोला शहरामध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या न्यु तापडीया नगर भागातील लोकसंख्येचा विचार करण्यात आला होता.

सदर मुख्य जलवाहिनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि अकोला महानगरपालिका प्रशासनाच्या समन्वयाने टाकण्यात आलेली असून यासंदर्भात स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द तक्रारीच्या अनुषंगाने अकोला महानगरपालिका व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या अधिकाऱ्यांनी तक्रार स्थळी जाऊन त्या भागातील स्थानिक लोकप्रतिनिधीसोबत चर्चा करून त्यांचे निरसन करण्यात आले होते.

(३), (४) व (५) दिनांक १९/१२/२०१९ रोजीच्या रेल्वे प्रशासनाच्या पत्रान्वये रेल्वे लाईन क्रॉसिंगची परवानगी नाकारली नसून फक्त रेल्वे क्रॉसिंगचे स्थान बदलण्याबाबत सुचविले आहे.

भविष्यात रेल्वे प्रशासन व अकोला महानगरपालिकेतर्फे संयुक्त पाहणी करून त्यानुसार नवीन जागा निश्चित करण्याचे अकोला महानगरपालिकेचे नियोजन आहे.

तसेच अमृत अभियानांतर्गत टाकण्यात आलेली पाईप लाईन शहरातील लगतच्या भागाकरीता वापरण्यात येत असल्यामुळे झालेला खर्च भविष्यात अकोला शहरास पाणीपुरवठा करण्याच्यादृष्टीने उपयोगी येणार आहे.

पुर्णा (जि.परभणी) येथील ताडकळस विश्रामगृहाची दुरुस्ती करण्याबाबत

(६१) * ७१५४ श्री.विप्लव बाजोरिया : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुर्णा (जि.परभणी) येथील ताडकळस विश्रामगृहातील वातानुकूलित सुविधा बंद असून पाण्याची कमतरता, तुटलेल्या नळाच्या तोट्या, शौचालयाची दुरवस्था, फुटलेल्या खिडक्या, जागोजागी पडलेला छताचा भाग तसेच रंगरंगोटी न झाल्याने विश्रामगृहाच्या इमारतीची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुर्णा येथील ताडकळस विश्रामगृहाच्या इमारतीच्या झालेल्या दुरवस्थेस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन सदर इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१) ताडकळस ता.पुर्णा येथे सार्वजनिक बांधकाम विभागाचे विश्रामगृह अस्तित्वात नाही तथापि, पुर्णा-ताडकळस रस्त्यावर पुर्णा येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहाची इमारत सन १९८७ मध्ये बांधण्यात आलेली असून सद्य:स्थितीत अस्तित्वातील इमारतीचे विस्तारीकरण व नुतनीकरण आवश्यक आहे.

(२) पुर्णा विश्रामगृह इमारतीचे विस्तारीकरण व नुतनीकरण प्रस्तावित असल्याने किरकोळ विशेष दुरुस्ती अंतर्गत कामे करण्यात आलेली नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

वसई-विरार महापालिकेत पंतप्रधान आवास घरकुल योजनेंतर्गत प्राप्त प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

(६२) * ७७७५ श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्थिक दुर्बल घटकातील लाभार्थ्यांसाठी केंद्र शासनाने सन २०१५ पासून सुरू केलेल्या पंतप्रधान आवास घरकुल योजनेंतर्गत वसई-विरार महापालिकेला २६५ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी १५७ मंजूर प्रस्ताव महापालिकेत प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत तीन वर्षापासून सदर १५७ प्रस्तावास मंजुरी मिळालेली असतानाही ते प्रलंबित असल्याचे सर्वसाधारण कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात आर्थिक दुर्बल घटकांतील लाभार्थ्यांसाठी "पंतप्रधान आवास योजनेची" अंमलबजावणी करण्यात येत असल्याची बाब वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

सदर योजनेंतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिकेकडे आर्थिक व दुर्बल घटकांतर्गत एकूण २६५ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी १६६ पात्र लाभार्थ्यांचे अर्ज सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता शासन नियुक्त KPMG या संस्थेकडे पाठविण्यात आले आहेत.

(२) केंद्र शासनामार्फत सन २०१५ पासून सुरु करण्यात आलेल्या पंतप्रधान आवास योजनेंतर्गत शासनाने योजना लाभार्थ्यांची निवड निश्चिती करण्याकरीता KPMG या संस्थेस नियुक्त केले आहे. तथापि, सदर योजनेची प्रसिध्दी शिबिरे, कार्यशाळा व बॅनरव्दारे केल्याचे वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

दरम्यान सदर योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या अर्जांची संख्या अल्प असल्याने योजनेच्या मार्गदर्शक सूचनातील निकषांमध्ये शासन परिपत्रक दिनांक २०/१०/२०१८ नुसार सुधारणा करण्यात आली आहे. तद्नंतर याआधारे वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात प्रसिध्दी देऊन अर्ज मागविण्यात आले आहेत.

सदर योजनेंतर्गत महानगरपालिकेकडे प्राप्त २६५ अर्जांची छाननी करण्यात आली आहे. तसेच बऱ्याच अर्जांमध्ये असलेल्या त्रुटींची पुर्तता करुन एकूण १६६ लाभार्थ्यांचे अर्ज महानगरपालिकेच्या प्रभाग समिती स्तरावर पात्र ठरविण्यात आले.

सन २०२० मध्ये उद्भवलेल्या कोविड-१९ प्रादुर्भावाच्या पार्श्वभुमीवर वसई-विरार शहर महानगरपालिकेने या योजनेसंदर्भात कार्यवाही स्थगित ठेवली आहे.

तथापि, उपरोक्त बाबींमुळे काही विलंब झाला असून या योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांचा विस्तृत प्रकल्प अहवाल बनविण्याकरीता शासन नियुक्त KPMG या संस्थेकडे अर्ज व इतर कागदपत्रे माहे, डिसेंबर २०२० मध्ये वसई-विरार शहर महानगरपालिकेने पाठविले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

श्री.राजेन्द्र भागवत
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.